26 Nov 2026_Layout 1 11/25/2026 11:40 PM Page 1

बीड, परभणी, लातूर, धाराशिव, जालना, नांदेड, मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर.... या जिल्हयात एकाचवेळी प्रकाशित होणारे

नोव्हेंबर/November
गुरूवार/Thursday
दि.२६/Dt: 26
२०२६/2026

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

www.jagmitra.com

सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ६ पाने Pages 6

किंमत ३ रूपये Price 3 rupees

Jagmitra2010@gmail.com

बीड/Beed • वर्ष १७ वे/Year 17 • अंक ३४/Issue 34 • आरएनआय नं.एमएचएमएआर/२०११/३८८१४ /RNI.No.MAHMAR/2011/38814

अर्धापूरच्या डॉ.इक्बाल हायस्कूलमधील भरतीचा नवा फार्स; शिक्षण विभागाच्या लेखी नकाराला कथित आश्वासनाची बगल?

कागदावर नकार अन् पडद्यामागून वैयक्तिक मान्यतेचे गाजर! अर्धापूरच्या भरती प्रकरणात शिक्षण विभागाचे गौडबंगाल?

बैठक न घेताच घरी बोलावून ठरावावर सह्यांचा अट्टाहास! अर्धापूरमधील नियमबाह्य शिक्षक भरतीला कोणाचे अभय?

''तुम्ही प्रस्ताव दाखल करा, मी मान्यता देतो!'' शिक्षण अधिकाऱ्यांच्या नावाने वैयक्तिक मान्यतेचा नवा डाव; अर्धापूरमध्ये खळबळ!

शिक्षण विभागाचा आदेश की कोणाची वैयक्तिक जहागिरी? अर्धापूर एज्युकेशन सोसायटीतील कथित भ्रष्टाचार आणि भरतीवर मौन का?

अर्धापूर/मकसूद पटेल

शिक्षण विभागाचे आदेश हे कायद्याच्या अंमलबजावणीसाठी असतात की केवळ सरकारी फायलींमध्ये धूळ खात पडून राहण्यासाठी? एकीकडे भरतीच्या प्रस्तावाला लेखी नकार द्यायचा आणि दुसरीकडे त्याच भरतीला वैयक्तिक मान्यता मिळवून देण्याचे आश्वासन दिले जात असल्याची चर्चा रंगवायची! हा नेमका कोणता प्रशासकीय कारभार सुरू आहे?अर्धापूर येथील डॉ. इक्बाल उर्दू मॉडेल हायस्कूलमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी भरतीच्या वादाने आता अत्यंत गंभीर वळण घेतले असून, जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीवरच मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. २८ जुलै २०२६ रोजी अर्धापूर एज्युकेशन सोसायटी संचालित डॉ. इक्बाल उर्दू मॉडेल हायस्कूलमधील शिक्षक भरतीची जाहिरात प्रसिद्ध झाली होती. त्यानंतर ८ ऑगस्ट २०२६ रोजी आवश्यक कायदेशीर बाबींची पूर्तता नसतानाही मुलाखतीचा फार्स उरकण्यात आल्याची माहिती समोर आली. १६ ऑगस्ट २०२६ रोजी परवानगीचा तांत्रिक व कायदेशीर प्रश्न उपस्थित झाल्याने माध्यमिक शिक्षणाधिकारी (जिल्हा परिषद, नांदेड) यांनी या भरतीच्या प्रस्तावास स्पष्ट शब्दांत नकार दिला.

शिक्षण विभागाने लेखी नकार दिलेला असतानाही, ही भरती रेटून नेण्याचे पडद्यामागून जोरदार प्रयत्न सुरू असल्याची विश्वसनीय माहिती सूत्रांकडून मिळत आहे. अर्धापूर एज्युकेशन सोसायटीचे व शाळा समितीचे वादग्रस्त अध्यक्ष सय्यद वसीम बारी सय्यद शमसुद्दीन हे शाळा समितीची कोणतीही अधिकृत बैठक न घेताच, तयार केलेल्या कथित ठरावावर सह्या मिळविण्यासाठी संबंधितांवर दबाव आणत असल्याचा गंभीर आरोप होत आहे. शाळेचे मुख्याध्यापक तथा शाळा समितीचे सदस्य सचिव सिद्दीकी मुशीर अहमद यांच्यासह समिती सदस्यांना थेट घरी बोलावून सह्या घेतल्या जात असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.शाळा समितीचा ठराव म्हणजे कोणाच्या दिवाणखान्यात बसून सह्यांचा गठ्ठा तयार करण्याचा कागद नव्हे! समितीची पूर्वसूचना, विषयपत्रिका, प्रत्यक्ष चर्चा आणि अधिकृत इतिवृत्त या कायदेशीर प्रक्रियेला बगल देऊन सह्या मिळवण्याची ही घाई नेमकी कशासाठी सुरू आहे?

शिक्षणाधिकारी व उपशिक्षणाधिकाऱ्यांच्या नावाने वैयक्तिक मान्यतेचे गाजर?



या संपूर्ण प्रकरणाला सर्वात स्फोटक वळण देणारी बाब म्हणजे, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर आणि उपशिक्षणाधिकारी रामचंद्र पाचंगे यांच्या नावाने दिले जाणारे कथित आश्वासन! ''तुम्ही प्रस्ताव दाखल करा, मी तुम्हाला वैयक्तिक मान्यता देतो!'' असे आश्वासन शिक्षण विभागातील या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून मिळाल्याचा दावा वसीम बारी यांच्याकडून केला जात असल्याची जोरदार चर्चा आहे.मोठा सवाल: ज्या भरतीला शिक्षण विभागाने १६ ऑगस्ट रोजी अधिकृतरीत्या नकार दिला, त्याच भरतीला वैयक्तिक मान्यता देण्याचा शब्द कोणत्या नियमात बसतो? शिक्षण विभागाचा लेखी आदेश मोठा की बंद दाराआड सांगितले जाणारे तोंडी आश्वासन? जर या अधिकाऱ्यांच्या नावाचा वापर करून शाळा समितीच्या सदस्यांवर दबाव आणला जात असेल, तर संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने पुढे येऊन यावर आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे. अन्यथा, या संशयाच्या भोवऱ्यात शिक्षण विभागाची विश्वासार्हता पूर्णपणे धुळीस मिळाल्याशिवाय राहणार नाही.

वादाच्या भोवऱ्यात कार्यकारिणी; भ्रष्टाचाराच्या तक्रारी फायलीतच बंद!

अर्धापूर एज्युकेशन सोसायटीच्या विद्यमान कार्यकारिणीची वैधता आणि धर्मादाय आयुक्तांकडील बदल अहवालच मुळात वादात अडकलेले आहेत. व्यवस्थापनाचा अधिकारच वादात असताना, या पदाधिकाऱ्यांना भरती करण्याचा नैतिक आणि कायदेशीर अधिकार कोणी दिला? याहून धक्कादायक बाब म्हणजे, या संस्थेतील कथित आर्थिक गैरव्यवहार आणि प्रशासकीय अनियमिततेबाबत शिक्षणाधिकारी माधव सलगर यांच्याकडे यापूर्वीच तक्रारी दाखल झाल्याचे सांगितले जाते. मात्र, या तक्रारींवर आजतागायत कोणती चौकशी (पान २ वर)

सुनावणी झाली, आता निर्णयासाठी पंचांग पाहताय काय?

नियमबाह्य अनुकंपा नियुक्तीप्रकरणी शिक्षण उपसंचालक दीपक चवणे यांचे मौन; संबंधितांना अभय देण्यासाठीच निर्णयाची चालढकल सुरू आहे काय?

नांदेड/लातूर (मकसूद पटेल)

शासन निर्णय आहेत, न्यायालयीन निर्णय आहेत, कागदोपत्री पुरावे आहेत, शिक्षण संचालकांचे स्पष्ट निर्देश आहेत आणि सुनावणीही झाली आहे; तरीही निर्णयाचा पत्ता नाही! मग लातूर विभागाचे विभागीय शिक्षण उपसंचालक दीपक चवणे साहेब, निर्णय देण्यासाठी नेमका कोणता मुहूर्त शोधत आहात? शासनाच्या नियमांपेक्षा अधिकाऱ्यांची मर्जी मोठी झाली आहे काय? नांदेड जिल्ह्यातील कथित नियमबाह्य अनुकंपा नियुक्ती व शालार्थ मंजुरी प्रकरणात शिक्षण विभागाच्या कारभारावर आता गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

कंधार येथील मनोविकास प्राथमिक शाळेतील गणेश शिवराज पांपटवार यांच्या कथित नियमबाह्य अनुकंपा नियुक्ती, वैयक्तिक मान्यता व शालार्थ मंजुरी प्रकरणी माहिती अधिकार कार्यकर्ते मकसूद पटेल लोहगांवकर यांनी शिक्षण विभागाकडे वारंवार तक्रारी, शासन निर्णयांच्या प्रती, न्यायालयीन न्यायनिवाडे आणि अधिकृत कागदोपत्री पुरावे सादर केले आहेत. संबंधित शिक्षण सेवकाची माता श्रीमती शारदा



शिवराज पांपटवार या जिल्हा परिषद, नांदेड अंतर्गत नियमित सेवेत शिक्षिका म्हणून कार्यरत असताना संबंधितास अनुकंपा नियुक्तीचा लाभ कसा देण्यात आला? शासन निर्णय आणि न्यायालयीन न्यायनिवाड्यांकडे दुर्लक्ष करून वैयक्तिक मान्यता व शालार्थ मंजुरी देण्याची घाई कशासाठी करण्यात आली? या प्रश्नांची उत्तरे शिक्षण विभागाने दिली पाहिजेत.

विशेष म्हणजे, प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिनांक २७ मे २०२६ रोजी निर्गमित केलेल्या पत्रात मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबामध्ये कोणी शासकीय नोकरीत असल्यास इतर सदस्यांना अनुकंपा नियुक्तीचा लाभ देय होत नसल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे. तसेच संबंधित शिक्षण सेवकाचे वेतन तात्काळ थांबवून शालेय (पान २ वर)

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कुटुंबीयांचा पाद्यपूजन व सन्मान करण्याचा अण्णासाहेब जाधव यांना लाभला मानाचा योग!





शिंदे साहेबांनी स्वतः हात धरून स्टेजवर बोलावले; जाधव व त्यांच्या टीमच्या सन्मानाने भारावले मान्यवर

मुंबई/प्रतिनिधी

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या उपस्थितीत सामाजिक कार्यकर्ते अण्णासाहेब जाधव यांना एक अविस्मरणीय आणि मानाचा क्षण अनुभवण्याचा योग आला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांनी स्वतः अण्णासाहेब जाधव यांचा हात धरून त्यांना स्टेजवर बोलावून घेतले. त्यानंतर अण्णासाहेब जाधव व त्यांच्या संपूर्ण टीमच्या वतीने शिंदे साहेबांच्या कुटुंबीयांचे विधिवत पाद्यपूजन करून सन्मान करण्यात आला. या प्रसंगी धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठानचे मराठवाडा अध्यक्ष ॲड. प्रणित डिकले, बीड जिल्हाध्यक्ष संदीप चाळक, अण्णासाहेब जाधव, ओम जाधव, सुनील जाधव, दत्ताभाऊ साळुंखे यांच्यासह मित्रपरिवार उपस्थित होता. उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या कुटुंबीयांचे पाद्यपूजन व सन्मान स्वतः करण्याचा बहुमान मिळाल्याने अण्णासाहेब जाधव (पान २ वर)

फुलचंदराव कराड यांच्या प्रयत्नांना यश, ओंकारकडुन ३३५० रुपयांचा ऊसदर जाहिर

शेतकर्यांना सोबत घेवुन दिले होते निवेदन, शेतकऱ्यांनी मानले कराड यांचे आभार

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

परळी तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी महत्वाचा असलेला ऊसदराचा प्रश्न घेवुन शिवसेनेचे महाराष्ट्र राज्य समन्वयक फुलचंदराव कराड यांनी पांगरी येथील ओंकार शुगरवर शेतकऱ्यांसह धडक मारल्यानंतर कारखाना प्रशासनाने कराड यांची मागणी तात्काळ मान्य करत चालु गळीत हंगामासाठी गाळप झालेल्या ऊसाला प्रतिटन ३३५० रुपये इतका दर



जाहिर केला.या चांगल्या ऊसदर निर्णयाचे स्वागत करत शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी मी सदैव लढा देणार असल्याचे फुलचंदराव कराड यांनी सांगितले.आजारातुन उठल्यानंतर फुलचंदराव कराड यांनी शेतकऱ्यांसाठी ऐतिहासिक लढा देत यशस्वी केल्याबद्दल शेतकरी वर्गातुन कराड यांचे आभार मानण्यात येत आहेत.

परळी तालुक्यातील शेतकर्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडवणाऱ्या ओंकार शुगर युनिट नं.८ कडुन यावर्षी ऊस दर जाहीर करण्याबाबत चालढकल केली जात होती.शेतकर्यांचे अनेक प्रश्न हाती घेवून शिवसेनेचे महाराष्ट्र राज्य समन्वयक फुलचंदराव कराड हे दि.१८ नोव्हेंबर रोजी शेतकर्यांसह कारखान्यावर जाऊन मागण्यांचे निवेदन (पान २ वर)

बीड जिल्ह्यातील सर्वाधिक दर :- ओंकार साखर कारखान्याचा गळीत हंगाम २०२६-२७ साठी ३३५०/- ऊसदर जाहीर

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

चालु २०२६-२७ च्या गळीत हंगामासाठी ओंकार साखर कारखाना प्रा. लि., युनिट क्र. ८, पांगरी (ता. परळी, जि. बीड) यांच्या वतीने ऊसदरासंदर्भातील घोषणा करण्यात आली आहे. कारखान्याचे मा .चेअरमन श्री. बाबुरावजी बोत्रे पाटील साहेब यांच्या वतीने उसदराची घोषणा करण्यात आली असून गळीत हंगाम २०२६-२७ साठी ३३५०/- ऊसदर जाहीर करण्यात आला आहे. शेतकऱ्यांनी वर्षभर केलेल्या कष्टाची खरी किंमत देणे,हि आमची जबाबदारी आहे.ऊसाला सर्वाधिक दर देणारा ओंकार साखर कारखाना बीड जिल्ह्यात अव्वल ठरला आहे.



ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या दिलासा देण्याच्या दृष्टीने ही घोषणा महत्त्वपूर्ण मानली जात आहे. ऊस गाळप हंगामाच्या पार्श्वभूमीवर कारखान्यांकडून जाहीर होणारे ऊसदर हा शेतकऱ्यांसाठी नेहमीच महत्त्वाचा आणि जिव्हाळ्याचा विषय असतो. ऊस उत्पादन खर्च,मजुरी,वाहतूक आणि शेतीच्या वाढत्या खर्चाचा विचार करता ऊसदराकडे शेतकऱ्यांचे विशेष लक्ष असते. ओंकार साखर कारखान्याने २०२६-२७ च्या हंगामासाठी बीड जिल्ह्यात अव्वल असा ३३५०/- ऊसदर जाहीर केला आहे . या घोषणेमुळे परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.कारखान्याचे मा.चेअरमन श्री. बाबुरावजी बोत्रे पाटील साहेब यांनी या माध्यमातून ऊस उत्पादकांना मोठा दिलासा दिला आहे.दरम्यान, पहिला हप्ता ३२००/- रुपये आणि दिवाळी हप्ता १५०/- रुपये असे प्रतिटन ३३५०/- रुपये ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्राप्त होणार आहेत. तरी सर्व शेतकरी बांधवांनी आपला ऊस ओंकार साखर कारखान्यास गाळपास द्यावा असे आव्हान कारखान्याचे जनरल मॅनेजर यांनी केले.

जागतिक महापौर परिषदेत परळीचे प्रतिनिधित्व!

मुंबई/प्रतिनिधी

मुंबई येथे आयोजित तिसऱ्या जागतिक महापौर परिषदेत (World Mayors Forum 2026) विशेष निमंत्रित म्हणून परळीच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांना सहभागी होण्याची संधी मिळाली, ही अतिशय आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. उद्घाटन सोहळ्यास महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस साहेब,केंद्रीय नगर विकास राज्य मंत्री तोखन साहू जी,मुंबईच्या महापौर रितूजी तावडे,यांच्यासह अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे अध्यक्ष रणजितजी चव्हाण, उपाध्यक्ष राजकिशोर जी मोदी, सचिव निवृत्त खअड जयराज जी फाटक यांच्यासह अनेक देशातील महापौर शासकीय अधिकारी, विविध क्षेत्रातील तज्ञ मंडळी उपस्थिती होती.

ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंटच्या वतीने आयोजित या आंतरराष्ट्रीय परिषदेत जगातील ३२ देशांतील निमंत्रित महापौर आणि नागरी नेतृत्वातील प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. या जागतिक व्यासपीठावर परळी वैजनाथ नगर परिषदेचे प्रतिनिधित्व करताना विशेष आनंद होत आहे. या



परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) चा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजातील वापर, जिओ-इन्फॉर्मेशन सिस्टीम (GIS) द्वारे शहरांचे नियोजन, घनकचरा व्यवस्थापन, शहरांचे भूमिगत पायाभूत सुविधांचे व्यवस्थापन, वाढत्या नागरीकरणातील आव्हाने तसेच केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची आखणी करताना स्थानिक स्वराज्य संस्थांचे मत विचारात घेण्याची आवश्यकता अशा महत्त्वपूर्ण विषयांवर जागतिक तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली विचारमंथन होत आहे.

आधुनिक तंत्रज्ञान, प्रभावी नागरी प्रशासन आणि शाश्वत शहर विकासाच्या जागतिक संकल्पना समजून घेण्याबरोबरच विविध देशांतील महापौरांचे अनुभव व कार्यपद्धती जाणून घेण्याची ही एक महत्त्वपूर्ण संधी आहे. माझी नुकतीच अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था (AIILSG) च्या नियामक मंडळावर सदस्य म्हणून बिनविरोध निवड झाली. त्यानंतर या जागतिक महापौर परिषदेत विशेष निमंत्रित म्हणून मिळालेला सहभाग हा परळी शहराच्या दृष्टीनेही महत्त्वाचा टप्पा आहे. या परिषदेतून मिळणारे ज्ञान, अनुभव आणि आधुनिक संकल्पना परळी शहराच्या विकासासाठी तसेच नगर परिषदेचे कामकाज अधिक सक्षम, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित करण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरतील, असा विश्वास आहे. जागतिक व्यासपीठावर परळीचे प्रतिनिधित्व करण्याची ही संधी म्हणजे आपल्या शहराच्या विकासाच्या नव्या संकल्पनांना दिशा देणारा महत्त्वपूर्ण अनुभव आहे! आपले सहकार्य आणि शुभेच्छा सदैव सोबत राहोत.

सौ.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी
नगराध्यक्षा, परळी वैजनाथ नगर परिषद

श्री साईबाबांच्या समाधीस्थळी रवींद्र पापा गित्ते व जयश्रीताई गित्ते यांनी घेतले मनोभावे दर्शन



परळी वैजनाथ/प्रतिनिधी

साईभक्त तथा उद्योजक रवींद्र (पापा) गित्ते सेठ आणि परळी वैजनाथ नगर परिषदेच्या पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्रीताई रवींद्र (पापा) गित्ते यांनी बुधवारी सकाळी पवित्र तीर्थक्षेत्र शिर्डी येथे श्री साईबाबांच्या समाधीस्थळी मनोभावे दर्शन घेतले. यावेळी साईबाबांची विधिवत पूजा करून परळी शहरातील नागरिकांना पाण्याची कोणतीही कमतरता भासू देऊ नका, शहराचा पाणीपुरवठा सुरळीत राहू द्या, अशी मनोभावे प्रार्थना करण्यात आली. तसेच परळी परिसरात लवकरात लवकर समाधानकारक पाऊस पडू द्या, शेतकरी बांधवांना दिलासा मिळू द्या आणि परळी परिसर दुष्काळमुक्त होऊ द्या, असे साकडे साईबाबांच्या चरणी घालण्यात आले. नागरिकांना पुरेसे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आणि पाणीपुरवठ्याची जबाबदारी सक्षमपणे पार पाडण्यासाठी आम्हाला बळ व शक्ती द्यावी, अशीही प्रार्थना यावेळी करण्यात आली. (पान २ वर)

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

गोविंदसिंह राजपुत (जिल्हा प्रतिनिधी) मो. 9921876500 PRGI.NO.MHMAR/26/A0224

धाराशिव जिल्हा आवृत्ती गुरूवार दि.२६ नोव्हेंबर २०२६ पान नं. २

आता संभाजी नगर, पुणे, मुंबई येथे जाण्याची गरज नाही

मुळव्याध : संडासच्या जागी आग होणे, दुखणे, कोंब येणे, रक्त जाणे, जागा लहान होणे, फिशर

सांधेदुखी : पाठीच्या मणक्याचे त्रास, चमक मारणे, गॅप पडणे, गुडघे दुखी, टाचदुखी, मानपाठ, कंबरदुखी, हातपायाला मुंग्या येणे, नस दबणे, डोकेदुखी, अंग दुखणे,

स्त्रीयांचे सर्व आजार : मुल बाळ होत नसल्यास वजन जास्त असणे, केस गळणे, चक्करयेणे, घबराहट, बैचेनी, झोप न येणे, पचनाचे व पित्ताचे त्रास, पोटदुखी, हाडीताप, मुतखडा, त्वचारोग, ॲलर्जि सर्दी, खोकला, दमा.

रविवारी दवाखाना बंद राहील

डॉ.रविंद्र ईटके आयुर्वेद व पंचवर्ग तज्ञ (पुणे)

डॉ.सौ.भाग्यश्री ईटके स्त्रीरोग व आयुर्वेद तज्ञ

वेळ : स. ११ ते २.३० संध्या : ६ ते ८

सोनोग्राफी सेंटर समोर पदमावती गल्ली, परळी. वै

मो.9822816010, 7588596838

विश्वश्री : आयुर्वेद हॉस्पिटल व पंचकर्म केंद्र

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सर्वस्तरीय उपायोजना करा- मनसेची मागणी

जळकोट/विजय पिसे

महाराष्ट्र नवनिर्माण सेना ,धाराशिव जिल्ह्याच्यावतीने, जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले , यंदाच्या एल निनोमुळे पाऊस पडला नाही. त्यामुळे दुष्काळाचे भयावह संकट उभे राहिले आहे. शासनस्तरावरून राज्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. दुष्काळामुळे भविष्यात भलेमोठे संकट उभे राहणार आहे. खरीप हंगाम पूर्णपणे वाया गेला आहे. शेतकऱ्यांच्या पदरात शून्य उत्पन्न आले आहे. शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या जीवन मरणाचा प्रश्न उभा राहिला आहे. भविष्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी हेक्टरी एक लाख रुपये मदतीची तातडीची गरज आहे. शेतकऱ्याला पुन्हा उभे करण्यासाठी दुष्काळी मदतीचे अनुदान तात्काळ वितरण करण्याची व्यवस्था करण्यात यावी. पशुपालक शेतकऱ्यांना भविष्यात चारा टंचाई निर्माण होणार नाही. यासाठी चारा छावण्या, चारा डेपो त्वरित सुरू करण्यात याव्यात. शेतकऱ्यांनी फायनान्स, मायक्रो फायनान्स, बँक



व सावकाराकडून घेतलेल्या कर्जाला तात्काळ स्थगिती द्यावी. उत्पन्न ज्या वेळेस निघेल. त्यावेळेस कर्ज फेडीचे उपायोजना करावी. शेतकऱ्यांना नवीन तात्काळ कर्ज उपलब्ध करून द्यावे. कर्जमाफी योजना तात्काळ अमलात आणून नियमित कर्ज फेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान द्यावे. या दुष्काळी उपाययोजनामुळे भविष्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी नक्की मदत होणार आहे. शेतमजूर, कामगार व महिला शेतमजूर , एकल महिला कुटुंबांना आर्थिक संरक्षण देण्यात यावे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर त्यांनाही मदत जाहीर करून तात्काळ अनुदान वितरित करण्यात यावे. रोजगार हमीची कामे तात्काळ सुरू करावेत. जेणेकरून हाताला काम मिळेल. दुष्काळात कुटुंब चालवणे अवघड आहे. त्यामुळे सर्व स्तरावरील उपायोजनांची अंमलबजावणी तात्काळ होणे गरजेचे आहे. मजूर तेथे हाताला काम देण्याची वेगळी यंत्रणा उभी करण्यात यावी. शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनींना बस प्रवास पूर्णतः मोफत करावा. शैक्षणिक शुल्क त्वरित माफ करावे. पाणीटंचाईच्या गावात टँकरची त्वरित व्यवस्था करावी. विविध विकास कामांचा आढावा घेऊन स्थगिती देण्यात येऊन, दुष्काळाच्या उपायोजनांना प्राधान्य द्यावे. गावागावात असलेल्या स्वयंसेवी संस्थांना जलसंधारणाची कामे द्यावीत. ग्राम स्तरावर शासकीय समिती स्थापन करून विविध घटकांना समावेश करून या समितीमार्फत दुष्काळाच्या उपायोजना कराव्यात.

तरी मे. साहेबांना विनंती की, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या या मागण्याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. सर्व स्तरावरील उपाययोजना सुरू कराव्यात. या निवेदनावर जिल्हाध्यक्ष महेश जाधव, तुळजापूर तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन कुंभार, तुळजापूर विधानसभा अध्यक्ष मयूर गाढवे, तालुका सचिव धनाजी साठे, तुळजापूर शहराध्यक्ष धर्मराज सावंत, शहर उपाध्यक्ष अविनाश पवार, समीर शेख, सोमेश्वर आलुरे व जिल्ह्यातील मनसे कार्यकर्ते उपस्थित होते.

इंदापूर तालुक्यातील निमसाखर गावांमध्ये त्रिपुरारी पौर्णिमा साजरी



इंदापूर/गणेश धनवडे

या पौर्णिमेनिमित्त गावातील दत्त मंदिरामधून श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पादुकांची ग्राम प्रदक्षिणा काढण्यात आली.

या सोहळ्यामध्ये सर्व स्वामीभक्त महिलांनी चौकाचौकांमध्ये रांगोळी काढून पालखीचे स्वागत केले. पालखी मंदिरामध्ये आल्यानंतर श्री ह.भ.प.अंकुश महाराज बनसोडे कचरवाडी निमगाव केतकी यांचे सुश्राव्य असे दत्त चरित्रावर प्रवचन झाले. तसेच मंदिरातील रांगोळीची सुंदर सेवा सौ शितल सुनील टकले यांनी केली. तसेच पालखीची सजावट श्री राजेंद्र मारुती घोडे यांनी नेहमीप्रमाणे केली. तसेच स्वामींच्या हाराची सेवा श्री राजाराम संभाजी जाधव यांनी नेहमीप्रमाणे केली. रांगोळी साठी लागणारी फुलांची सेवा श्री महादेव मारुती माळी यांनी नेहमीप्रमाणे केली. तसेच दिंडी सोहळ्याला महादेव भजनी मंडळाने साथ दिली. तसेच जप व आरती झाल्यानंतर सर्व स्वामी भक्तांना श्री नितीन सदाशिव कारंडे यांच्याकडून महाप्रसाद देण्यात आला. या कार्यक्रमाला सर्व स्वामीभक्त महिला व सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून....

डॉ.इक्बाल हायस्कूल

झाली? कोणते अभिलेख तपासले गेले? प्रथमदर्शनी तथ्य आढळूनही हे प्रकरण लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे का सोपवले गेले नाही? या सर्व प्रश्नांवर शिक्षण विभागाने मौन का बाळगले आहे, याचे उत्तर नांदेडच्या जनतेला हवे आहे.

पात्र उमेदवारांच्या भविष्याशी खेळ थांबवा!

शिक्षक भरती ही कोणाची वैयक्तिक जहागिरी नाही. बेकायदेशीर पद्धतीने नियुक्त्या करून उमेदवारांना नोकरीचे आमिष दाखवायचे आणि नंतर वैयक्तिक मान्यता नाकारून त्यांना वाऱ्यावर सोडायचे, हा प्रकार खपवून घेतला जाणार नाही. आता चेंडू नांदेड जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या कोर्टात आहे. शाळा समितीचे मूळ इतिवृत्त पुस्तक व उपस्थिती नोंदवही ताब्यात घेऊन, तसेच समिती सदस्यांचे स्वतंत्र जबाब नोंदवून या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होणार की, आश्वासनांच्या जोरावर नियमबाह्य भरतीवर शिक्कामोर्तब होणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

.....

सुनावणी

शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक २३ ऑगस्ट २०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार एकस्तर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सुनावणी घेऊन नियमानुसार योग्य निर्णय घेण्याचे निर्देश दिले होते. एवढे स्पष्ट निर्देश असतानाही निर्णय घेण्यास विलंब कशासाठी? शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी दिनांक १६ जून २०२६ रोजी विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केला. त्यानुसार दिनांक १० ऑगस्ट २०२६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. मात्र, संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे सदर सुनावणी होऊ शकली नाही. त्यानंतर विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाने दिनांक २५ सप्टेंबर २०२६ रोजी पत्र निर्गमित करून दिनांक २९ सप्टेंबर २०२६ रोजी पुनश्च सुनावणी आयोजित केली. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार सदर सुनावणी पार पडूनही आजतागायत निर्णय निर्गमित करण्यात आलेला नाही. शिक्षण संचालकांच्या निर्देशांना जवळपास सहा महिने आणि सुनावणीला जवळपास दोन महिने उलटले, तरीही निर्णय कोणत्या फाईलखाली अडकला आहे? या संपूर्ण प्रकरणात तत्कालीन विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर डॉ. गणपत शंकर मोरे आणि तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड डॉ. सविता बिरगे यांच्या भूमिकेवरही तक्रारदारांनी गंभीर आक्षेप घेतले आहेत. शासन निर्णय, मा. उच्च न्यायालयाचे लागू न्यायनिवाडे आणि शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन न करता संबंधित नियुक्तीला मान्यता देण्यात आल्याचा आरोप आहे. या आरोपांची चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्यास शिक्षण विभागाला नेमकी कोणती अडचण आहे? अनियमितता सिद्ध झाल्यास तत्कालीन अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही केव्हा होणार? सरकारी तिजोरी म्हणजे कुणाची खासगी जहागीर नव्हे! जनतेच्या करातून जमा झालेल्या प्रत्येक पैशाचा हिशेब प्रशासनाला द्यावाच लागेल. सर्वसामान्य कर्मचाऱ्यांवर कारवाई करताना नियमांचा बडगा उगारणारे शिक्षण विभागाचे प्रशासन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या जबाबदारीचा प्रश्न उपस्थित होताच मौन का बाळगते? निर्णय लांबणीवर टाकून संबंधितांना अप्रत्यक्ष संरक्षण दिले जात आहे काय, असा सवाल तक्रारदारांनी उपस्थित केला आहे. दीपक चवणे साहेब, केवळ सुनावण्या घेणे म्हणजे प्रशासन चालविणे नव्हे; त्या सुनावण्यांवर कायद्याच्या चौकटीत सकारण निर्णय देणे हीदेखील आपली प्रशासकीय जबाबदारी आहे. शिक्षण संचालकांचे निर्देश दप्तरी धूळ खात पडण्यासाठी आहेत काय? निर्णय घेण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे जाहीर करून तात्काळ लेखी निर्णय निर्गमित करावा आणि अनियमितता सिद्ध झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कार्यवाही करावी, अशी मागणी मकसूद पटेल लोहगांवकर यांनी केली आहे. शासनाच्या नियमांचे राज्य चालणार की अधिकाऱ्यांच्या मर्जीचा कारभार? दीपक चवणे साहेब, निर्णय देणार तरी कधी?

.....

अण्णासाहेब जाधव

यांनी आनंद आणि कृतज्ञता व्यक्त केली. या सन्मानाबद्दल उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब, त्यांचे पुतणे मनोजदादा शिंदे तसेच वहिनीसाहेब यांनी अण्णासाहेब जाधव व त्यांच्या टीमचे मनापासून आभार व्यक्त केले. हा क्षण माझ्यासाठी आणि माझ्या संपूर्ण टीमसाठी कायम स्मरणात राहणारा असून, साहेबांचे प्रेम, आपुलकी आणि सन्मान हीच आमच्यासाठी मोठी प्रेरणा असल्याची भावना सामाजिक कार्यकर्ते अण्णासाहेब जाधव यांनी व्यक्त केली.

सामाजिक कार्यकर्ते अण्णासाहेब जाधव

.....

रवींद्र पापा गित्ते

शिर्डी येथे सद्गुरू साईबाबांच्या समाधीस्थळी दर्शन घेण्याचा दोन वेळा योग आल्याने विशेष आनंद आणि आत्मिक समाधान लाभल्याची भावना गित्ते दाम्पत्याने व्यक्त केली. साईबाबांच्या चरणी नतमस्तक होत श्रद्धापूर्वक पूजा करण्यात आली. श्रद्धा आणि सबुरी हा साईबाबांनी दिलेला अमूल्य संदेश प्रत्येकाच्या जीवनाला दिशा देणारा आहे. त्यांच्या आशीर्वादाने समाजसेवेचे कार्य करण्यासाठी सदैव ऊर्जा, बळ आणि शक्ती मिळत राहावी, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. तसेच श्री साईचरणी राखी अर्पण करून सर्वांच्या कल्याणासाठी मनोभावे प्रार्थना करण्यात आली. या प्रसंगी श्री साई मंदिर संस्थान मंडळाच्या वतीने साईभक्त तथा उद्योजक रवींद्र (पापा) गित्ते सेठ आणि नगर परिषद पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्रीताई गित्ते यांचा सन्मान करण्यात आला. या सन्मानाबद्दल त्यांनी मंदिर संस्थान मंडळाचे आभार मानले. साईनाथ महाराजांची कृपादृष्टी सर्वांवर सदैव राहावी, प्रत्येकाच्या जीवनातील संकटे दूर होऊन सुखसमाधान नांदावे, अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली. यावेळी गित्ते परिवारातील सदस्य उपस्थित होते. दरम्यान, बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री प्रभू वैद्यनाथांच्या पावन परळी नगरीपासून अवघ्या तीन किलोमीटर अंतरावर चांदापूर येथील श्री डोंगर तुकाई परिसरात गित्ते परिवाराच्या पुढाकारातून साईबाबांचे भव्य आणि दिव्य मंदिर उभारण्यात आले आहे. या मंदिरामुळे परळी शहरासह पंचक्रोशीतील साईभक्तांना शिर्डीप्रमाणेच स्थानिक पातळीवर दर्शनासाठी एक श्रद्धास्थान उपलब्ध झाले आहे. या मंदिरात दररोज मोठ्या संख्येने भाविक श्रद्धेने दर्शनासाठी येतात. श्रद्धा, भक्ती आणि सेवाभावातून उभे राहिलेले हे मंदिर परिसरातील धार्मिक आणि आध्यात्मिक वातावरण अधिक समृद्ध करणारे ठरत आहे. सामाजिक, राजकीय आणि धार्मिक क्षेत्रात गित्ते परिवाराचा सातत्याने सहभाग असून समाजहिताच्या विविध कार्यांतही परिवाराचे योगदान राहिले आहे. शिर्डी येथे साईबाबांचे दोन वेळा दर्शन घेण्याचा लाभलेला योग आणि परळीकरांच्या पाणीप्रश्नासह परिसरातील दुष्काळी परिस्थिती दूर होण्यासाठी साईचरणी केलेली प्रार्थना यामुळे या दर्शनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ओम साईरामच्या जयघोषात साईबाबांचे दर्शन घेत गित्ते दाम्पत्याने सर्वांच्या कल्याणाची कामना केली. यावेळी मित्र परिवार उपस्थित होते.

.....

फुलचंचराव कराड

दिले.यावेळी कार्यकारी संचालक साळुंके व कारखाना प्रशासनाने कराड यांच्याशी प्रदिर्घ चर्चा करत प्रत्येक प्रश्नावर समाधानकारक उत्तर दिले.यावेळी फुलचंद्रराव कराड यांनी यावर्षीच्या दुष्काळामुळे गाळप झालेल्या ऊसाला चांगला भाव द्या व पैसे एकरकमी द्या ही मागणी लावुन धरली होती.ही मागणी कारखाना प्रशासनाने मान्य करत दि.२५ नोव्हेंबर रोजी चालू गळीत हंगामासाठी ऊसदर जाहिर केला आहे.यात पहिला हप्ता ३२०० रुपये आणि दिवाळी हप्ता १५० रुपये असे प्रतिटन ३३५० रुपये ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्राप्त होणार आहेत.यामुळे परळी तालुक्यातील शेतकर्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असुन आजारपणातुन बाहेर आल्यानंतर फुलचंद भाऊंनी आपल्यासाठी ऐतिहासिक लढा उभारुन कारखाना प्रशासनाशी चर्चा करत हा विक्रमी भाव मिळवून दिल्याबद्दल भाऊंचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत.दरम्यान ओंकार कारखान्याने जाहिर केलेल्या ऊस दरावर प्रतिक्रिया देताना फुलचंद्रराव कराड यांनी सांगितले की,परळी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी मी कायम लढत आलेलो आहे.आजारपणातुन बाहेर आल्यानंतर ऊस उत्पादक शेतकर्यांचे प्रश्न हाती घेतले.यातील महत्वाचा असलेला ऊसदराचा प्रश्न मार्गी लागला असुन इतर प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

शेवटच्या पानावरून...

हिंगोली उत्पादन शुल्क विभाग

महसूल जमा करता आला आहे. त्यामुळे महसूल वसुलीचा वेग आणि विभागाच्या कामकाजाबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

जुलैपासून अधीक्षकपद रिक्त

उत्पादन शुल्क विभागातील अधीक्षकपद जुलै महिन्यापासून रिक्त आहे. सुरुवातीला हिंगोलीचा अतिरिक्त पदभार नांदेड येथील अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला होता. त्यानंतर मागील काही महिन्यांपासून लातूर येथील अधिकाऱ्यांकडे हा पदभार देण्यात आला आहे. मात्र, संबंधित अधिकारी आठवड्यातून दोन वेळाच हिंगोलीत येत असल्याने उर्वरित दिवस कार्यालयाचा कारभार स्थानिक कर्मचाऱ्यांच्या भरवशावर सुरू असतो. वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियमित उपस्थिती नसल्याने कामकाजाचा आढावा, कर्मचाऱ्यांवरील नियंत्रण आणि प्रशासकीय निर्णयप्रक्रियेवर परिणाम होत असल्याचे चित्र आहे. महत्त्वाचे पद रिक्त ठेवून अतिरिक्त पदभारावर कारभार चालविण्याची वेळ विभागावर का आली, असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

ग्रामीण भागात अवैध दारू विक्रीचा सुळसुळाट

एकीकडे परवानाधारक व्यवसायातून महसूल गोळा करण्याचे उद्दिष्ट असताना दुसरीकडे जिल्ह्यातील ग्रामीण भागात अवैध दारू विक्रीचा प्रश्न गंभीर बनत आहे. अनेक गावांमध्ये विनापरवाना दारू विक्री सुरू असल्याच्या तक्रारी आहेत. अशा ठिकाणी नियमित तपासणी करून कारवाई करण्याची जबाबदारी उत्पादन शुल्क विभागाची असतानाही त्याकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याची चर्चा आहे. अवैध दारू विक्री रोखण्याऐवजी या प्रकारांकडे दुर्लक्ष होत असल्याने संबंधित यंत्रणेच्या कामकाजावर नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. अवैध दारू विक्रीचा विषय समोर आल्यानंतर अनेकदा पोलिस विभागाकडे बोट दाखवले जाते. मात्र, उत्पादन शुल्क विभागाचीही यामध्ये तितकीच महत्त्वाची जबाबदारी आहे. विनापरवाना दारू विक्री करणाऱ्यांवर कारवाई, परवानाधारक दुकानांची तपासणी आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई यासाठी स्वतंत्र यंत्रणा असतानाही प्रत्यक्षात प्रभावी नियंत्रण दिसत नसल्याचे चित्र आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियमित उपस्थिती नसल्याने क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या चार महिन्यांत ६.३९ कोटींचे उद्दिष्ट गाठण्याचे आव्हान मार्च अखेरपर्यंत ७.२७ कोटी रुपयांचे महसूल वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करायचे असताना आठ महिन्यांत केवळ ८८ लाख रुपये जमा झाले आहेत. त्यामुळे उर्वरित चार महिन्यांत विभागाला आणखी ६.३९ कोटी रुपयांचा महसूल जमा करावा लागणार आहे. एवढ्या कमी कालावधीत मोठे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी विभागाला महसूल वसुलीचा वेग वाढवावा लागणार आहे. मात्र, जिल्ह्यात कायमस्वरूपी अधीक्षक नसताना या कामांचे नियोजन आणि आढावा कसा घेतला जात आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. कोट्यवधींचा महसूल देणाऱ्या विभागाला कायमस्वरूपी अधिकारी मिळत नसणे, ग्रामीण भागातील अवैध दारू विक्रीवर प्रभावी नियंत्रण नसणे आणि महसूल वसुलीचे उद्दिष्ट पिछाडीवर राहणे, या सर्व बाबी चिंताजनक आहेत. त्यामुळे शासनाने हिंगोलीत तातडीने कायमस्वरूपी अधीक्षक नियुक्त करावा आणि विभागाच्या कामकाजाचा आढावा घेऊन अवैध दारू विक्रीविरोधात ठोस कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. यासंदर्भात उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

एकाच ठिकाणी ठाण मांडलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या कधी?

हिंगोली जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय सुरू झाल्यापासून काही कर्मचारी एकाच ठिकाणी कार्यरत असल्याची चर्चा आहे. काही कर्मचारी ज्येष्ठता यादीतून नाव कमी होण्यासाठी लगतच्या जिल्ह्यात एक-दोन वर्षे बदली करून घेतात आणि त्यानंतर पुन्हा हिंगोलीत नियुक्ती मिळवतात, असा आरोप केला जात आहे. या प्रकारामागे संबंधित कर्मचाऱ्यांना कोणाचे अभय आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. एकाच कार्यालयात दीर्घकाळ कार्यरत राहिल्याने काही कर्मचाऱ्यांकडून मनमानी कारभार केला जात असल्याचीही चर्चा आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नियंत्रण नसल्याने अशा कर्मचाऱ्यांवर कारवाई कोण करणार, हा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे दीर्घकाळ एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या कधी होणार आणि त्यांच्या कामकाजाची चौकशी होणार का, याकडे लक्ष लागले आहे.

.....

पाहणी

आहे. मात्र, टँकर वेळेवर गावात पोहोचतो का, प्रत्यक्षात किती पाणी उपलब्ध होते आणि ग्रामस्थांना पुरेशा प्रमाणात पाणी मिळते का, याची अधिकाऱ्यांनी पाहणी केली. पाणीपुरवठ्यात कोणतीही दिरंगाई होऊ नये, तसेच नागरिकांना नियमित व पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध करून द्यावे, अशा सूचना संबंधित यंत्रणेला देण्यात आल्या. यावेळी गोपाळपूर सरपंच प्रतिनिधी राजेश सोनवणे, प्रमोद सोळंके सह प्रशासकीय अधिकारी कर्मचारी ग्रामस्थ उपस्थित होते.

.....

ॲड.राहुल अर्जुन पायके

स्त्रियांचा सन्मान, सामाजिक सलोखा आणि देशाची एकता व अखंडता जपणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. तसेच समाजातील जातीय भेदभाव, अन्याय, शोषण आणि असमानतेविरुद्ध संविधानिक मार्गाने आवाज उठविण्याची भूमिका तरुणांनी स्वीकारली पाहिजे. भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेतील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये प्रत्येक तरुणाच्या विचारांत आणि कृतीत उतरली पाहिजेत. बेरोजगारी, शिक्षण, सामाजिक विषमता, महागाई आणि भ्रष्टाचार यांसारख्या प्रश्नांवर लोकशाही मार्गाने भूमिका मांडण्यासाठी संविधानाचे ज्ञान अत्यंत महत्त्वाचे आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. संविधान हे कोणत्याही एका व्यक्तीचे, पक्षाचे, जातीचे किंवा धर्माचे नसून भारतातील प्रत्येक नागरिकाचे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी, युवक-युवतींनी संविधानाची प्रस्तावना वाचावी, मूलभूत अधिकार आणि कर्तव्ये समजून घ्यावीत आणि संविधानिक मूल्यांचा दैनंदिन जीवनात अंगीकार करावा, असे आवाहन ॲड. राहुल अर्जुन पायके यांनी केले. पीपल्स थॉटस इन इंडिया युथ क्लबच्या माध्यमातून तरुणाईला भारतीय संविधानाची ओळख करून देणे आणि लोकशाही मूल्यांबाबत जनजागृती करणे हा या उपक्रमामागील प्रामाणिक उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. ''जागरूक तरुणाई हीच लोकशाहीची खरी ताकद आणि संविधाननिष्ठ तरुणाई हाच सक्षम भारताचा भक्कम पाया आहे,'' असा संदेश ॲड. राहुल अर्जुन पायके यांनी या खुल्या पत्रातून दिला आहे.

.....

वसंत मुंडे

या व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळण्यात अडथळे येत असल्याचा आरोप करत, या संपूर्ण प्रक्रियेची पारदर्शक चौकशी करण्याची मागणीही वसंत मुंडे यांनी केली आहे. पीक विम्याच्या प्रश्नावर त्यांनी मा. राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल, राज्याचे मुख्य सचिव तसेच केंद्र व राज्य सरकारकडे मुद्देनिहाय निवेदने सादर केल्याची माहिती दिली. धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना न्यायालयीन आदेशानुसार मिळणाऱ्या पीक विम्याच्या लाभाची अंमलबजावणी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतील पात्र शेतकऱ्यांसाठी करण्यात यावी. तसेच पीक विमा कंपन्यांच्या जाचक तांत्रिक अटी दूर करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पारदर्शक पद्धतीने आणि वेळेत नुकसानभरपाई द्यावी, अशी प्रमुख मागणी किसान काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केंद्र व राज्य सरकारकडे केली आहे.

.....

कपिलधार

करण्यात आली होती. श्री क्षेत्र कपिलधार येथील संत मन्मथस्वामी यांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेऊन आंध्र प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू तसेच महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या हजारो भाविकांनी बुधवारी परळीतील प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेतले. भाविकांच्या मोठ्या संख्येमुळे वैद्यनाथ मंदिर परिसरात दिवसभर गर्दीचे वातावरण होते. महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. दरम्यान, बेलवाडी परिसरात बेलफूल, नारळ व पूजाविधीसाठी लागणाऱ्या साहित्याची दुकाने मोठ्या संख्येने थाटण्यात आल्याने संपूर्ण परिसराला जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. गेल्या अनेक वर्षांपासून वीरशैव लिंगायत समाज व श्री मन्मथस्वामी सेवा संघाच्या वतीने ही सेवाभावी परंपरा अखंडपणे जपली जात आहे. कपिलधारहून येणाऱ्या भाविकांना महाप्रसादाच्या माध्यमातून सेवा देण्याचा हा उपक्रम सर्वांच्या कौतुकाचा विषय ठरत आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री मन्मथस्वामी सेवा संघाचे शिवराजआप्पा बोटूळे, रामकिशन साखरे, संदीप हालगे, मधुकर स्वामी, सोमनाथ आप्पा ओपळे, श्रीमती वनिता स्वामी, त्रिंबक समय्या स्वामी, राजकुमार महाजन, शिवाप्पा चौंडे, वर्षाताई चौंडे यांच्यासह समाजातील अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

टि.सी. हरवला आहे

दिनेश बालचंद लोढा, फाउंडेशन स्कुल, परळी वै. जि.बीड या विद्यार्थ्यांची १० वी पास टि. सी. परळी ते अंबाजोगाई प्रवासादरम्यान हरवली आहे. सदर टी.सी. कोणास सापडल्यास कृपया खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

मो.९०२२३३८६९१

जाहीर प्रगटन

परळी शहर व तालुक्यातील आणि सिरसाळा येथील तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे १. मोहम्मद हारुण सय्यद रा. हमालवाडी, परळी वै. जि. बीड. २. आरेफ पिता रईस कुरेशी रा. कुरेशी नगर, परळी वै. जि. बीड यांनी आमच्या ऑफिसवर येऊन माहिती, सुचना व कागदपत्र दिल्यावरुन तसेच अधिकार दिल्यावरुन सदर जाहिर प्रगटन देण्यात येते की, मिर्झा सलमान महेफुज बेग रा. सिरसाळा ता. परळी वै. जि. बीड यांना त्यांचे नांवावरील जमीन विक्री करावयाची असल्याने आमचे पक्षकाराची त्यांच्या सोबत ओहख झाली व त्यांनी त्यांचे नांवावरील मौजे सिरसाळा येथील जमीन गट क्र. ६८ मधील एकुण क्षेत्र ०७ हेक्टर ८२ आर जमीनीपैकी क्षेत्र ०२ हेक्टर ०० आर जमीन जिची चतुर्सिम पुर्वेस -नोमाण महेफुज बेग, पश्चिमेस - देशमुख यांची जमीन, दक्षिणेस पोहनेर रस्ता व २० फुट रुंदीचा रस्ता व उत्तरेस- बालाजी कैलास ढेंबरे यांची जमीन., वरील चतुसिमेच्या आतील संपुर्ण ०२ हेक्टर ०० आर जमीन आमचे पक्षकारास दि. ०५.०२.२०२५ रोजी कायमस्वरुपी विक्री करण्याचा ठराव नोटरी रजि. दस्त क्र. १८२/२०२५ अन्वये केला व सदर दिवशी आमचे पक्षकाराने मिर्झा सलमान महेफुज बेग यांना ईसारापोटी रक्कम रु. ३,००,०००/- अक्षरी तीन लाख रुपये दिले आहेत व त्यांनी आमचे पक्षकाराच्या हक्कात रक्कम मिळाल्या बाबतची रशीद पावती व ईसारपावती लिहून दिलेली आहे व आमचे पक्षकाराचा प्रत्यक्ष जायमोक्यावर जाऊन ताबा व कब्जा मिर्झा सलमान महेफुज बेग यांनी करुन दिलेला आहे व तेंव्हापासून आमचे पक्षकार हे सदरील शेत जमीनीचा वापर व उपभोग घेत आहेत व आज रोजी सदरील शेत जमीन आमचे पक्षकाराच्या ताबे कब्जेउपभोगात आहे. आमचे पक्षकाराने मिर्झा सलमान महेफुज बेग यांना बाकी राहिलेली रक्कम स्विकारुन रितसर खरेदीखत आमचे पक्षकाराच्या नांवे करुन द्यावे असे बऱ्याच वेळा तोंडी व नोटीसव्दारे कळविलेले आहे. परंतु असे असतांना सुध्दा मिर्झा सलमान महेफुज बेग हे महसूल अभिलेखात त्यांचे नांवाची नोंद असल्याचा गैरफायदा घेवून सदरची शेत जमीन मिळकत जास्तीची रक्कम घेवून आमचे पक्षकाराच्या हक्कात खरेदीखत करुन न देता त्यांचे परस्पर ईतर कोणासही विक्री, हस्तांतरण, गहाण, तारण, बक्षीस, ईसारपावती, दानपत्र करण्याच्या प्रयत्नात आहेत किंवा सदर मिळकतीवर कोणत्याही बँकेचे, व्यक्तीचे कर्ज घेण्याच्या तयारीत आहेत व तसे झाले तर आमचे पक्षकाराचे कधीही न भरुन येणारे असे आतोनात नुकसान होणार आहे.

तरी सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, मिर्झा सलमान महेफुज बेग रा. सिरसाळा ता. परळी वै. जि. बीड यांचे बरोबर वर दर्शविलेल्या मिळकती बाबत कोणीही खरेदी, विक्री, हस्तांतरण, गहाण, तारण, बक्षीस, ईसारपावती किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार करु नये. तसा केल्यास त्याचे खर्चाची व परिणामाची सर्वस्वी जबाबदार ही संबंधीत व्यक्तीवर राहिल याची नोंद घ्यावी. सबब हे जाहिर प्रगटन देण्यात येते.

दि. २१/११/२०२६.

जाहिर प्रगटन देणार

मार्फत :-
ॲड.वाय.आर.सय्यद
न्यायालय, परळी वैजनाथ.
मो. क्र. ९९२३१४९७८६.

१. मोहम्मद हारुण सय्यद

26 Nov 2026 jalna page 3_Layout 1 11/25/2026 9:12 PM Page 1

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

विष्णू निवृत्ती कदम
(संपादक जालना, आवृत्ती), ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

PRGI.No.- MHMAR/25/A2848

जालना | गुरूवार दि.२६ नोव्हेंबर २०२६ | पान ३

शंभर वर्षांची परंपरा असलेला नेरचा कार्तिक मास उत्सव

जालना/प्रतिनिधी

जालना तालुक्यातील नेर येथे श्री भगवान वटेश्वराचे मंदिर असून नेर येथील ब्राह्मण समाजाच्या वतीने भगवान श्री वटेश्वरास कोजागिरी पौर्णिमा ते कार्तिक पौर्णिमा पर्यंत म्हणजेच एक महिना भगवान श्री वटेश्वरास रुद्र अभिषेक केला जातो. त्यानंतर कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी शेवटी महाप्रसादाचे आयोजन केले जाते. एक महिना साजरा होणाऱ्या या उत्सवाची सांगता मोठ्या आनंदात व उत्साहात साजरी केली जाते. विशेष म्हणजे या कार्तिक मास उत्सवास जवळपास शंभर वर्षांची परंपरा असल्याचे ज्येष्ठ मंडळीच्या वतीने सांगण्यात



येते.

या उत्सवात बाहेरगावी गेलेली समाज बांधवही नेरला मोठ्या प्रमाणात या ऊत्सवानिमीत येतात. नुकताच कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी या वर्षीचा उत्सव पार पडला असून कार्यक्रमाच्या यशस्वतेसाठी साठी प्रमोद नंद, राजेश कुलकर्णी, रत्नाकर नंद, सुरेंद्र कुलकर्णी, उपेंद्र कुलकर्णी, राहुल कुलकर्णी, शिवम कुलकर्णी, संदीप कुलकर्णी विश्वांभर जोशी, महेश नंद, सुनील कुलकर्णी, रमेश नंद, रत्नाकर जोशी, जगदीश कुलकर्णी गोविंद जोशी, सुरेश कुलकर्णी अमोल कुलकर्णी अनंता जोशी आदींनी. परिश्रम घेतले.

जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश धाब्यावर! मंठ्यात तलाठ्यांचे खासगी दरबार; सज्जा सोडून कारभार, शेतकऱ्यांच्या आर्थिक लुटीचे आरोप!

मंठा/प्रतिनिधी

महसूल प्रशासनातील कामकाजाला शिस्त लागावी, तलाठ्यांनी नेमून दिलेल्या सज्जा मुख्यालयाच्या ठिकाणी उपस्थित राहून नागरिकांची कामे करावीत, यासाठी जालना जिल्हाधिकारी यांनी २८ मे २०२६ रोजी स्पष्ट निर्देश दिले होते. मात्र, जिल्हाधिकाऱ्यांच्या या आदेशाला मंठा तालुक्यातील काही तलाठ्यांनी अक्षरशः केराची टोपली दाखवली आहे का? असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे.

मंठा तालुक्यातील अनेक तलाठ्यांची नियुक्ती विशिष्ट महसूल सज्जांवर करण्यात आलेली असताना संबंधित सज्जा ठिकाणी कार्यालयीन कामकाज होत नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. काही तलाठी आपल्या नियुक्तीच्या सज्जा ठिकाणी न थांबता मंठा शहरातील खासगी ठिकाणांहून कारभार चालवत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. एवढेच नव्हे, तर काही ठिकाणी तलाठ्यांच्या जागी खासगी व्यक्तीच शासकीय कामकाज पाहत असल्याची गंभीर बाब चर्चेत आहे.

तलाठ्यांच्या खुर्चीवर खासगी व्यक्तींचा कारभार?

शेतकऱ्यांना सातबारा, फेरफार, उत्पन्न दाखले, विविध महसुली प्रमाणपत्रे, ई-पीक पाहणीसह अन्य कामांसाठी तलाठी कार्यालयात चकरा माराव्या लागत आहेत. मात्र, सज्जा ठिकाणी तलाठी उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना मंठा शहरात धाव घ्यावी लागत असल्याचे चित्र आहे. तलाठी स्वतः उपस्थित न राहता खासगी व्यक्तींकडून कामकाज करून घेत असल्याच्या आरोपांमुळे शासकीय कार्यालयाच्या गोपनीयतेचा, जबाबदारीचा आणि पारदर्शकतेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

शेतकऱ्यांच्या खिशावर डल्ला; रोजंदारीच्या नावाखाली आर्थिक लूट?

विशेष म्हणजे, तलाठ्यांच्या अनुपस्थितीत खासगी व्यक्तींकडून कामे करून घेण्यासाठी शेतकऱ्यांकडून पैशांची मागणी होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. संबंधित खासगी व्यक्तींची रोजंदारी काढण्यासाठी शेतकऱ्यांकडून आर्थिक वसुली केली जात असल्याचा आरोप आहे. शेतकऱ्यांना आपल्या हक्काच्या शासकीय कामासाठीही आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असेल, तर याची जबाबदारी नेमकी कोणाची? या प्रकाराला महसूल प्रशासनातील कोणाचे अभय आहे का? असे सवाल उपस्थित होत आहेत.

जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश कागदावरच?

२८ मे रोजी प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी तलाठ्यांनी आपल्या नियुक्तीच्या सज्जा ठिकाणी कार्यालय उपलब्ध असल्यास तेथे उपस्थित राहून काम करणे बंधनकारक केले होते. सज्जा ठिकाणी कार्यालय नसल्यास ग्रामपंचायत कार्यालयात, तेथेही सुविधा नसल्यास अन्य शासकीय इमारतीत कामकाज करण्याचे निर्देश देण्यात आले होते. खासगी जागेत कार्यालय सुरू करण्यासाठी संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी आवश्यक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले होते. तसेच प्रत्येक तलाठ्याने कामकाज पाहत असलेल्या ग्रामपंचायत कार्यालयाबाहेर नाव, मोबाइल क्रमांक आणि उपस्थितीचे दिवस व वेळ दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक करण्यात आले होते.

मात्र, मंठा तालुक्यात या आदेशाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होते आहे की केवळ कागदोपत्री पूर्तता केली जात आहे, याची तपासणी करण्याची वेळ आली आहे.

तहसीलदार आणि उपविभागीय अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष तपासणी करावी!

मंठा तालुक्यातील सर्व तलाठी सज्जांची अचानक तपासणी करून तलाठ्यांची प्रत्यक्ष उपस्थिती, कार्यालयीन कामकाज, दैनंदिन उपस्थिती नोंदवही, खासगी व्यक्तींचा हस्तक्षेप, शेतकऱ्यांकडून होणाऱ्या कथित आर्थिक वसुलीची चौकशी करण्यात यावी. तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी व नागरिकांमधून होत आहे.

एकीकडे शासन डिजिटल महसूल सेवा आणि पारदर्शक प्रशासनाचा दावा करते, तर दुसरीकडे शेतकऱ्यांना तलाठी शोधण्यासाठी मंठा शहराच्या चकरा माराव्या लागत असतील, तर या व्यवस्थेला जबाबदार कोण? जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश पाळला जात नसेल, तर संबंधित तलाठ्यांवर कारवाई कधी होणार? की मंठा तालुक्यात महसूल प्रशासनाचे स्वतंत्र नियम सुरू आहेत?

जालना सहकारी साखर कारखाना पुर्ववत सुरु करणे हीच बाळासाहेब पवार यांना खरी आदरांजली-अंकुश देशमुख

जालना/प्रतिनिधी

जालना, रामनगर येथील बंद पडेलेला जालना सहकारी साखर पुर्ववत सहकारी तत्त्वावर सुरू करणे, हीच सहकारमहर्षी तथा माजी खासदार कै. बाळासाहेब पवार यांना खरी आदरांजली ठरेल, असे विचार कारखान्याचे सभासद अंकुश आप्पा देशमुख यांच्यासह प्रमुख वक्त्यांनी आपले विचार मांडले विविध मान्यवरांनी बुधवार दि. २५ नोव्हेंबर रोजी कै. बाळासाहेब पवार यांच्या २७ व्या पुण्यतिथीनिमित्त कारखान्यासमोर आयोजित आदरांजली सभेत मांढले. सकाळी अकरा वाजता सुरू झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कारखाना बचाव संघर्ष समितीचे अध्यक्ष अंकुशराव देशमुख हे होते. सर्वप्रथम कारखाना परिसरात असलेल्या कै. बाळासाहेब पवार यांच्या पुतळ्यास दुग्धाभिषेक करण्यात आला. त्यानंतर पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी त्यांना अभिवादन केले. यावेळी ज्ञानेश्वर भांदरगे, अंकुशराव राऊत, सुभाष कोळकर, कारभारी महाराज अंभोरे, शिवाजी शेजूळ, प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया समर्थक कैलास फुलारी, कामगार प्रतिनिधी देवीदास बोंबले, भारत भांदरगे यांनी आपले विचार मांडले. यावेळी



अँड.सोपानराव भांदरगे, कमलाकर अंभोरे, मारोतराव मदन, सुरेश खडके, राजेंद्र जैस्वाल, कैलास देशमुख,सांडूजी दाभाडे, जगन्नाथ काळे, तात्यासाहेब भांदरगे, सलीम काजी हसनाबादकर, लक्ष्मण शिंदे, अंकीत आबड, चेतन खंडेलवाल, अंजेभाऊ चव्हाण लाला पाटील लकडे, ज्ञानेश्वर इंगोले, खालीलभाई, विक्रांत देशमुख, सुभाष देठे, अर्जुनराव भांदरगे, बाबुराव थिटे, साईराम थिटे, तुकाराम अंभोरे, केशव अंभोरे, शेख दिलावर शेख महंमद, पांडुरंग महाराज मदन, पंढरीनाथ मदन, प्रल्हाद मदन आदींसह परिसरातील शेतकरी, कामगार वर्गाची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

नमो शेतकरी महासन्मान निधीचे तीन हप्ते रखडले; शेतकऱ्यांना ६ हजारांची प्रतीक्षा!

मंठा/प्रतिनिधी

राज्यातील नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचे रखडलेले हप्ते तातडीने वितरित करण्यात यावेत, अशी मागणी मंठा तालुक्यातील शेतकरी वर्गातून होत आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येकी दोन हजार रुपयांचे तीन हप्ते प्रलंबित असल्याने पात्र शेतकऱ्यांना एकूण सहा हजार रुपयांची प्रतीक्षा करावी लागत आहे.

केंद्र शासनाच्या पीएम किसान सन्मान निधी योजनेचे हप्ते नियमितपणे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत असताना, राज्य शासनाच्या नमो शेतकरी महासन्मान निधीचे तीन हप्ते अद्याप मिळाले नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. आधीच दुष्काळी परिस्थिती, शेतीचा वाढता उत्पादन खर्च, खते-बियाण्यांचे दर आणि आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ही सहा हजार रुपयांची रक्कम



महत्त्वाची ठरत आहे.

दरम्यान, योजनेचे प्रलंबित हप्ते वितरित करण्यासाठी सुमारे ५ हजार ४२५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याबाबत वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात आल्याची चर्चा आहे. मात्र, या प्रस्तावाला मंजुरी कधी मिळणार आणि प्रत्यक्ष निधी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात कधी जमा होणार, याबाबत अद्याप स्पष्टता नसल्याने शेतकऱ्यांची प्रतीक्षा कायम आहे.

शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे कधी जमा होणार?

एकीकडे शासनाकडून शेतकरी कल्याणाच्या विविध योजनांची घोषणा केली जाते, तर दुसरीकडे हक्काच्या आर्थिक मदतीसाठी शेतकऱ्यांना प्रतीक्षा करावी लागत आहे. वित्त विभागाची मंजुरी मिळाल्यानंतर रखडलेल्या हप्त्यांच्या वितरणाची प्रक्रिया किती वेगाने पूर्ण होणार, याकडेळ शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

शासनाने केवळ निधी उपलब्धतेच्या प्रक्रियेची माहिती न देता, प्रलंबित हप्त्यांच्या वितरणाची निश्चित तारीख जाहीर करावी आणि पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात सहा हजार रुपये तातडीने जमा करावेत, अशी मागणी मंठा तालुक्यातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

दहिपुरी शिवारातून ट्रॅक्टर चोरणाऱ्या दोन चोरट्यांना छत्रपती संभाजीनगरमधून बेड्या; अंबड पोलिसांची धडाकेबाज कारवाई

अंबड/ज्ञानेश्वर साळुंके

अंबड तालुक्यातील दहीपुरी शेतातील आखाड्यावर उभा केलेला ट्रॅक्टर चोरून नेणाऱ्या दोन अट्टल चोरट्यांना अंबड पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे छत्रपती संभाजीनगर येथे सापळा रचून जेरबंद केले आहे. पोलिसांनी या कारवाईत चोरीस गेलेला ट्रॅक्टरही हस्तगत केला असून, या टोळीकडून परिसरातील इतरही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. नागेश्वर बबन फरताडे (वय २४) आणि आदित्य जालिंदर रांजणे (वय १९, दोघेही रा. दहिपुरी, ता. अंबड) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

नेमकी घटना काय?

दहिपुरी (ता. अंबड) येथील शेतकरी बळीराम पाराजी सावंत हे १९ नोव्हेंबर रोजी शेतीची कामे आटोपून त्यांचा लाल रंगाचा महिंद्रा जिवो (क्र. चक-२१-इट-१८४४) ट्रॅक्टर



शेतातील आखाड्यावर उभा करून घरी गेले होते. दुसऱ्या दिवशी, २० नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजेच्या सुमारास ते शेतात गेले असता आखाड्यावरून ट्रॅक्टर चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. परिसरात शोध घेऊनही ट्रॅक्टर न मिळाल्याने त्यांनी २२ नोव्हेंबर रोजी अंबड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल केला होता. व अंबड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू असताना, संशयित आरोपी छत्रपती संभाजीनगर परिसरात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार अंबड पोलिसांच्या पथकाने २३ नोव्हेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथील सातारा पोलिसांच्या मदतीने बीड बायपास रोडवरील 'हॉटेल शिदोरी' परिसरात सापळा रचून दोन्ही संशयितांना ताब्यात घेतले.

पोलीस कोठडीची मागणी:

पोलीस खाक्या दाखवताच दोन्ही आरोपींनी दहिपुरी शिवारातून ट्रॅक्टर चोरल्याची कबुली दिली. पोलिसांनी चोरलेला ट्रॅक्टर वडीगोद्री-अंबड रोडवरील डावरगाव फाट्याजवळून जप्त केला आहे. या आरोपींनी परिसरातील इतर शेतकऱ्यांची शेती अवजारे, जनावरे किंवा विद्युत मोटारी चोरल्या आहेत का, याचा सखोल तपास करण्यासाठी न्यायालयाकडे पोलीस कोठडीची मागणी करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी जालना पोलीस अधीक्षक तेघबीर सिह सधु अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.सिद्धेश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली अंबड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष घोडके, पोउपनि भगवान नरोडे, पोहेकॉ यशवंत मुंडे, दिपक चव्हाण, राजाभाऊ वाघमारे व पोशि अरुण मुंडे, आकाश वाघ, तुकाराम मदन यांच्या पथकाने पार पाडली.

बालकांच्या सुरक्षिततेसाठी 'सुरक्षित बचपन' अभियान महत्त्वपूर्ण पाऊल!

जालना/प्रतिनिधी

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना व शिक्षण विभाग, जिल्हा परिषद जालना यांच्या संयुक्त विद्यमाने पोक्सो कायदा जनजागृती अभियानाचा शुभारंभ; विद्यार्थ्यांना बालहक्क, कायदेशीर संरक्षण व बालसुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन या शिबिरात करण्यात आले. बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण करणे, त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे, बालकांमध्ये सुरक्षिततेविषयी जागरूकता निर्माण करणे तसेच समाजातील प्रत्येक घटकाला बालसंरक्षणाच्या जबाबदारीची जाणीव करून देण्याच्या उद्देशाने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना व शिक्षण विभाग, जिल्हा परिषद जालना यांच्या संयुक्त विद्यमाने 'सुरक्षित बचपन' पोक्सो कायदा जनजागृती अभियानाचा शुभारंभ बुधवार, दि. २५ नोव्हेंबर २०२६ रोजी जालना शहरातील पोदार इंटरनॅशनल स्कूल, मंठा रोड, जालना येथे उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला.



या कार्यक्रमास प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती मृदुला भाटिया यांची प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थिती होती. तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव श्री. नितेश बंडगर, गटशिक्षणाधिकारी श्री. मनोज कोल्हे, पोदार इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य श्री. जे. हेंरी डेव्हीड व शिक्षण विस्तार अधिकारी डॉ. रवींद्र काकडे यांच्या उपस्थितीत या अभियानाची सुरुवात करण्यात आली. बालकांचे संरक्षण, त्यांचे कायदेशीर अधिकार आणि त्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी न्यायव्यवस्था, शिक्षण विभाग, शाळा प्रशासन, शिक्षक व पालक यांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक असल्याचा महत्त्वपूर्ण संदेश यावेळी देण्यात आला.

गुरुनानक देवजींच्या ५५७ व्या जयंतीनिमित्त नरेश कपूर मित्र परिवाराचा मानवतावादी उपक्रम; गरजूंना ब्लँकेटचे वाटप



जालना/प्रतिनिधी

शीख धर्माचे संस्थापक गुरुनानक देवजी यांच्या ५५७ व्या जयंतीनिमित्त (प्रकाश पर्व) नरेश मगनलाल कपूर व मित्र परिवाराच्या वतीने जालना रेल्वे स्टेशन आणि बसस्थानक परिसरात थंडीमध्ये रात्र काढणाऱ्या गरीब, निराधार व गरजू नागरिकांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.यावेळी सामाजिक कार्यकर्ते राहुल सत्यनारायण करनाडे यांनी गुरुनानक देवजींच्या जीवनकार्याची व विचारांची माहिती दिली. नाम जपो, किरत करो आणि वंड छको या शिकवणीतून त्यांनी ईश्वराचे स्मरण, प्रामाणिक कष्ट आणि गरजूंसोबत आपल्या कमाईतील वाटा सामायिक करण्याचा संदेश दिला. तसेच संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांचा समता व जातिभेदमुक्त समाजाचा विचार, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मान्यवर कांशीराम साहेब यांच्या सामाजिक समता, स्वाभिमान, न्याय व बंधुतेच्या विचारांचे महत्त्व त्यांनी विशद केले.

महापुरुषांचे विचार केवळ जयंती-पुण्यतिथीपुरते मर्यादित न ठेवता ते आपल्या कृतीतून जपले पाहिजेत. जात-धर्माच्या पलीकडे जाऊन गरजू व्यक्तीला मदतीचा हात देणे हीच खरी मानवसेवा आहे, असा संदेश यावेळी देण्यात आला.या उपक्रमात नरेश मगनलाल कपूर, एकता कपूर, सिया कपूर, देवांश कपूर, हर्ष कपूर, खुशी कपूर, गजेंद्र खैरे, मुकेश परमार, रेणुका परमार, संतोष पांडे, विजय ओमप्रकाश भगत, पृथ्वीराजसिंग राजपूत आणि राहुल सत्यनारायण करनाडे सहभागी झाले. तसेच बसस्थानकातील वाहतूक नियंत्रण कर्मचारी अब्दुल मजीत व सुरक्षा रक्षक भाऊसाहेब खरात यांची उपस्थिती होती.

आयोजक : नरेश मगनलाल कपूर व मित्र परिवार, जालना.

सामाजिक संदेश : माणुसकीला जात-धर्म नसतो; गरजूंच्या मदतीला धावून जाणे हीच खरी मानवसेवा!

गाळ शेतकऱ्यांना मोफत काढण्याची परवानगी, डॉग शेल्टर हाऊस उभारण्याची मागणी

जालना/प्रतिनिधी

जालना शहर महानगरपालिका ४ थी सर्वसाधारण सभा भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी मुख्य सभागृहात पार पडली. या सर्व साधारण सभेत जालना शहरातील दुष्काळी परिस्थिती, संभाव्य पाणीटंचाई, मोकाट जनावरांचा वाढता उपद्रव आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांचे प्रश्न ऐरणीवर घेत नगरसेवक भास्कर आबा दानवे यांनी जालना शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत विविध महत्त्वपूर्ण विषयांवर ठाम भूमिका मांडली.तसेच आगामी काळातील पाणीटंचाई लक्षात घेता जलसंधारण व जलपुनर्भरणाच्या उपाययोजना आतापासूनच हाती घेण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. यावेळी घाणेवाडी व मोती तलावातील मासेमारी मक्त्याबाबत भूमिका मांडताना, संबंधित कंत्राटदाराला अपेक्षित नफा मिळाला नसल्याची बाब तसेच सध्याची दुष्काळी परिस्थिती विचारात घेऊन मक्त्याच्या अटी व शर्तींचा फेरविचार करून त्याला आणखी तीन वर्षांची मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच घाणेवाडी तलावातील साचलेला गाळ शेतकऱ्यांना मोफत काढून नेण्याची परवानगी द्यावी, अशी सूचनाही त्यांनी केली. यामुळे तलावाची पाणी साठवण क्षमता वाढण्यासोबतच शेतजमिनीची सुपीकता व जलधारण क्षमता सुधारण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले. शहरातील फुले मार्केट, स्व. रूपा पहेलवान चौक, जिंदल मार्केट आणि गांधी चमन यांसारख्या प्रमुख बाजारपेठांमध्ये सार्वजनिक स्वच्छतागृहांचा अभाव असल्याने महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे या ठिकाणी नवीन स्वच्छतागृहे उभारावीत किंवा अस्तित्वातील स्वच्छतागृहांचे नूतनीकरण करून त्यांची देखभाल व संचालन अथवा भाडेतत्त्वावर देण्याबाबत विचार करावा, अशी सूचना त्यांनी केली.

पुण्याचे नामकरण 'महात्मा फुले नगर' करा-संतोष जमधडे

जालना/प्रतिनिधी

पुणे हे शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे शहराचे नामकरण 'महात्मा फुले नगर' करण्यात यावे, अशी मागणी माळी महासंघ मराठवाडा विभागाच्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. ना. देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी पुण्यभूमीतून स्त्री शिक्षण, सामाजिक समता, अस्पृश्यता निर्मूलन, वंचित व शोषित समाजघटकांचे शिक्षण आणि सामाजिक न्यायासाठी ऐतिहासिक कार्य केले. त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक क्रांतीने महाराष्ट्रासह संपूर्ण देशाला नवी दिशा दिली. पुणे शहर हे त्यांच्या परिवर्तनवादी विचारांचे आणि ऐतिहासिक कार्याचे प्रमुख केंद्र राहिले आहे.

महात्मा फुले यांच्या महान कार्याची स्मृती कायमस्वरूपी जतन व्हावी, त्यांच्या विचारांचा प्रसार नव्या पिढीपर्यंत व्हावा आणि सामाजिक समता, शिक्षण व मानवतेच्या मूल्यांना अधिक बळ मिळावे, यासाठी पुणे शहराचे नामकरण 'महात्मा फुले नगर' करण्यात यावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

महात्मा फुले यांच्या ऐतिहासिक योगदानाला राष्ट्रीय स्तरावर सन्मान मिळावा, सामाजिक न्याय, स्त्री शिक्षण आणि समतेचा संदेश व्यापक स्वरूपात पोहोचावा, या उदात्त भावनेतून ही मागणी करण्यात आली असून, शासनाने या मागणीचा गांभीर्याने विचार करून आवश्यक कार्यवाही करावी, अशी विनंती महासंघाच्या वतीने करण्यात आली आहे.

या निवेदनावर संतोष विष्णूराव जमधडे (राष्ट्रीय सचिव तथा विश्वस्त, माळी महासंघ महाराष्ट्र), आसाराम वीरकर (राज्य सचिव), देवनाथ जाधव (विभागीय अध्यक्ष), सिताराम विधाते (महासचिव), महेश सत्रे (विभागीय उपाध्यक्ष), संतोष रासवे (जिल्हाध्यक्ष, जालना), धनंजय काळे (जिल्हाध्यक्ष, बीड), कल्याणराव रंधे (जिल्हाध्यक्ष, छत्रपती संभाजीनगर), विजय वीरकर (जिल्हाध्यक्ष, परभणी), अमोल गोरे (जिल्हाध्यक्ष, हिंगोली), लक्ष्मण घनवट (युवा आघाडी प्रदेश महासचिव, महाराष्ट्र)व भागवत राऊत (शहराध्यक्ष, जालना) यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

दैनिक जगमित्र आवृत्ती कार्यालय मंमादेवी शॉपिंग सेंटर दु. नं.१ रेल्वे स्टेशन रोड मस्तगड जुना जालना मो. ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

महाराष्ट्रातील निर्भिड दैनिक

जगमित्र

संतोष सोनवणे (लातूर जिल्हा प्रतिनिधी)
मो.9673158719

PRGI.No.- MHMAR/26/A2511

लातूर जिल्हा आवृत्ती — गुरूवार दि.२६ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ४



"कामखेडा रस्ता आपल्याच मतदारसंघात येतो, पाकिस्तानात नाही!"

आ.रमेशआप्पा कराड यांना कोंडीराम काळे यांचा खोचक सवाल; रेणापूरकामखेडा रस्त्याच्या दुरावस्थेवर शिवसेना आक्रमक

रेणापूर/प्रतिनिधी

रेणापूर ते कामखेडा रस्त्याची अक्षरशः चाळण झाली असून, ठिकठिकाणी पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. अनेक वर्षांपासून रस्त्याची दुरवस्था कायम असताना लोकप्रतिनिधींचे याकडे लक्ष का जात नाही? ''कामखेडा रस्ता आपल्याच मतदारसंघात येतो, पाकिस्तानात नाही!'' असा खोचक आणि संतप्त सवाल शिवसेनेचे रेणापूर तालुकाप्रमुख कोंडीराम जगन्नाथ काळे यांनी आमदार रमेशआप्पा कराड यांना उपस्थित केला आहे.

रेणापूर ते कामखेडा या मार्गावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून, रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. या मार्गावरून दुचाकी, चारचाकी तसेच इतर वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असते. मात्र, रस्त्यावरील खड्डे आणि खराब पृष्ठभागामुळे वाहनधारकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. लहान-मोठ्या अपघातांचा धोका कायम असल्याने प्रवाशांचा जीव मुठीत धरून प्रवास सुरू आहे.

हा रस्ता केवळ कामखेडा गावापुरता मर्यादित नसून, कामखेडा, वाला, तत्तापूर, वालेवाडी, वाल्मिक नगर आणि हतोला आदी गावांतील नागरिकांच्या दैनंदिन दळणवळणाचा महत्त्वाचा मार्ग आहे. त्यामुळे या रस्त्याच्या दुरवस्थेचा फटका शेतकरी, विद्यार्थी, रुग्ण, नोकरदार आणि सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. रस्त्याची अवस्था अशी असताना लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देणे अपेक्षित होते; मात्र अद्याप ठोस कार्यवाही दिसून येत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

अतिक्रमण हटवा, रस्त्याचे काम तातडीने सुरू करा!

रस्त्याच्या कडेला झालेल्या अतिक्रमणामुळेही वाहतुकीस अडथळे निर्माण होत असल्याची बाब निवेदनातून पुढे आली आहे. रस्त्याच्या हद्दीतील अतिक्रमण हटवून रस्ता मोकळा करावा, खड्ड्यांची तातडीने दुरुस्ती करावी आणि रस्त्याची परिस्थिती लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार नव्याने बांधकाम करावे, अशी मागणी शिवसेनेच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे करण्यात आली आहे.



२५ नोव्हेंबर २०२६ रोजी सार्वजनिक बांधकाम उपविभाग, रेणापूर येथील उपकार्यकारी अभियंत्यांना निवेदन देऊन रस्त्याच्या प्रश्नावर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली.

लोकप्रतिनिधींनी विकासाच्या गप्पा न मारता प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून परिस्थिती पाहावी!

मतदारसंघातील विकासकामांचा दावा केला जात असताना कामखेडा रस्त्यासारख्या महत्त्वाच्या मार्गाची अशी दयनीय अवस्था का? नागरिकांना खड्ड्यांतून प्रवास करण्याची शिक्षा आणखी किती दिवस भोगावी लागणार? प्रशासन आणि लोकप्रतिनिधी या रस्त्याच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहणार की नागरिकांनी अपघाताची वाट पाहायची? असे सवाल आता परिसरातून उपस्थित होत आहेत.

आमदार रमेशआप्पा कराड यांनी या रस्त्याच्या प्रश्नात तातडीने लक्ष घालून संबंधित विभागाला काम सुरू करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी कोंडीराम काळे यांनी केली आहे. रस्त्याची दुरुस्ती ही कोणाची मेहरबानी नसून नागरिकांच्या सुरक्षित प्रवासासाठी आवश्यक असलेली मूलभूत जबाबदारी आहे.

आता निवेदन, मागणी आणि सवाल यानंतर तरी प्रशासन व लोकप्रतिनिधी जागे होणार का, की कामखेडा रस्त्यावरील खड्डे नागरिकांच्या जीवाशी खेळत राहणार, हा प्रश्न अनुत्तरित आहे.

गटप्रवर्तकांना शासकीय सेवेत समायोजित करण्यासाठी मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घडवून आणण्याची मागणी

लातूर/संतोष सोनवणे

राष्ट्रीय आरोग्य अभियानातील ३ हजार ५०० पेक्षा अधिक गटप्रवर्तकांच्या प्रश्नांवर डॉ.ओमप्रकाश शेटे यांना संघटनेचे निवेदन

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत महाराष्ट्र राज्यात कार्यरत असलेल्या सुमारे ३ हजार ५०० पेक्षा अधिक गटप्रवर्तकांना कंत्राटी कर्मचाऱ्यांमध्ये समाविष्ट करून शासकीय सेवेत समायोजित करण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय आरोग्य मिशन गटप्रवर्तक संघटनेच्या वतीने आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश स. शेटे यांना निवेदन देण्यात आले.

बुधवार, दिनांक २५ नोव्हेंबर २०२६ रोजी देण्यात आलेल्या या निवेदनात गटप्रवर्तकांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीत गटप्रवर्तक महत्त्वाची भूमिका बजावत असून, राज्यभरातील आरोग्यविषयक उपक्रम आणि विविध जबाबदाऱ्या पार पाडण्यात त्यांचे योगदान आहे. मात्र, अनेक वर्षांपासून सेवा बजावत असतानाही त्यांच्या सेवेला योग्य शासकीय मान्यता व सुरक्षितता मिळालेली नाही. त्यामुळे गटप्रवर्तकांचा कंत्राटी कर्मचाऱ्यांमध्ये समावेश करून त्यांना शासकीय सेवेत समायोजित करण्याच्या मागणीवर सकारात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी संघटनेची भूमिका आहे. या मागण्यांबाबत सविस्तर निवेदनही सादर करण्यात आले असून, सदर मागण्या मार्गी लागण्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांच्यासोबत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची अधिकृत बैठक आयोजित करून द्यावी, अशी विनंती डॉ. शेटे यांच्याकडे करण्यात आली आहे. यावेळी संघटनेचे राज्य संघटक दत्ता देशमुख, प्रदेश कार्याध्यक्ष कमल बांगर आणि प्रदेशाध्यक्ष भगवान देशमुख यांनी निवेदनाद्वारे गटप्रवर्तकांच्या समस्या मांडल्या. गटप्रवर्तकांच्या प्रलंबित मागण्यांवर शासनस्तरावर सकारात्मक निर्णय होऊन हजारो कर्मचाऱ्यांना न्याय मिळणार का, याकडे राज्यातील गटप्रवर्तकांचे लक्ष लागले आहे. यावेळी उपस्थित गटप्रवर्तक थोरात छाया अभिमन्यू (औसा) कौडगावे शिवकन्या दत्तात्रय (अहमदपूर) बबली दिलीप हत्त (लातूर) बिरादार जयश्री राम (उदगीर) समगे बि.के . (चाकूर) घोडके जे. एम. (औसा) चव्हाण आर.ए. (शिरूर अनंतपाळ) नलाबले पी. एन. (रेणापूर) असे एकूण ३० गटप्रवर्तक उपस्थित होते.

बळीराजाच्या जीवनात आर्थिक क्रांती घडविण्यासाठी कटिबद्ध-माजी मंत्री आ.संजय बनसोडे

उदगीर/पाटील मनेश

दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी बांधव मोठ्या संकटाचा सामना करीत आहेत. पावसाअभावी पाण्याची उपलब्धता कमी झाल्याने शेतीसमोर अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आणि त्यांच्या शेतापर्यंत जाण्यासाठी चांगले रस्ते उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. बळीराजाच्या जीवनात आर्थिक क्रांती घडवून आणण्यासाठी आणि शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील आहोत, असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी केले.

उदगीर तालुक्यातील वाढवणा बु. येथे मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजनेअंतर्गत २५ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांच्या कामाचा शुभारंभ आमदार संजय बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी



ते बोलत होते.

कार्यक्रमाची सुरुवात दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला अभिवादन करुन करण्यात आली .

यावेळी जि.प. बांधकाम सभापती ज्ञानेश्वर बिरादार,जि.प. गटनेते रामचंद्र तिरुके, जि.प. गटनेते दिलीप मटके, तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, माजी उपसभापती बाळासाहेब मरलापल्ले, उपसभापती विकी भोसले, सर्जेराव भांगे, श्याम डावळे, प्रमोद पाटील, राजकुमार पाटील, झुंजार पाटील, भास्कर जाधव, बाबासाहेब काळे पाटील, प्रकाश बिरादार, धनराज नादरगे, कमलाकर फुले, ज्ञानेश्वर भांगे , रऊफ थोडगे,अनवर हवालदार, शिवाजी सुकणे, मधुकर बिरादार, प्रशांत बंडे, रामेश्वर सलगरे, भरत कुंडगीर, शिवकुमार हाळे, संगम आष्टुरे, पिंटु डावळे, बबन भांगे, महेबुब शेख, शिवाजी चिखले, शुभम केंद्रे, आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आ . संजय बनसोडे यांनी शेतकऱ्यांना शेतमालाची वाहतूक करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. पावसाळ्यात शेतापर्यंत जाणारे रस्ते खराब असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. शेत-पाणंद रस्ते विकसित झाल्यास शेतकऱ्यांना शेतीची मशागत, पेरणी, कापणी तसेच शेतमाल बाजारपेठेत पोहोचविणे अधिक सुलभ होणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतीच्या विकासाला चालना मिळणार आहे. उदगीर-जळकोट मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी रस्ते विकासाला आपण विशेष प्राधान्य दिले आहे. अतनूर ते वाढवणा तसेच अतनूर ते किणी या मार्गांसाठी हॅम योजनेंतर्गत सुमारे २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून रस्त्यांची कामे करण्यात आली आहेत. त्याचबरोबर अहमदपूर ते उदगीर या रस्त्यासाठी ३०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या माध्यमातून मतदारसंघातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रामीण

महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा! जगन्नाथ जाधव यांना बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाचा प्रतिष्ठेचा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

उदगीर/पाटील मनेश

देशातील बांधकाम व्यावसायिकांची अग्रगण्य आणि ऐतिहासिक संघटना असलेल्या 'बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया' यांच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष श्री. जगन्नाथ एस. जाधव यांची सन २०२५-२६ या वर्षासाठीच्या 'ॲप्रिसिएशन अवॉर्ड फॉर स्टेट चेअरमन' या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या संघटनात्मक कार्याची आणि नेतृत्वाची राष्ट्रीय स्तरावर दखल घेत हा सन्मान जाहीर झाल्याने महाराष्ट्राच्या बांधकाम क्षेत्रात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



१९४१ मध्ये पुण्यात स्थापना; संघटनेला ऐतिहासिक वारसा!

बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया या संघटनेला मोठा ऐतिहासिक वारसा लाभला आहे. भारताच्या स्वातंत्र्यपूर्व काळात १९४१ मध्ये पुणे येथे सदर्न कमांडचे ब्रिटिश इंजिनिअरिंग प्रमुख ब्रिगेडियर सी. व्ही. एस. जॅक्सन यांच्या पुढाकारातून या संघटनेची स्थापना झाली. विशेष म्हणजे, पुणे केंद्र हे बिल्डर्स असोसिएशन ऑफ

लातूर जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेवून मोफत आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी-डॉ.ओमप्रकाश शेटे

लातूर/प्रतिनिधी

जिल्ह्यातील सध्याच्या दुष्काळी परिस्थितीमध्ये लोकांना चांगल्या आरोग्य सुविधा मोफत उपलब्ध होण्यासाठी एकत्रित आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी. एकही पात्र व्यक्ती यापासून वंचित राहणार नाही, याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना आयुष्मान भारत मिशन समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी सांगितले.

एकत्रित आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत डॉ. शेटे बोलत होते. जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा परिषदेचे मुख्य



कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुजाता पाटील यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी, अंगीकृत रुग्णालयांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

दुष्काळाच्या संकट काळात गरजू रुग्णांना मोफत आणि चांगल्या आरोग्य सेवा मिळवून देण्यासाठी एकत्रित आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजना उपयुक्त ठरणार आहेत. जिल्ह्यातील ५० खासगी आणि ६६ शासकीय रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून या योजनांचा लाभ दिला जात असून यामाध्यमातून प्रत्येक कुटुंबाला ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार आहेत. तसेच मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी सुमारे ४.५ लाख रुपये दिले जातात. या योजनेंतर्गत जिल्ह्यातील सर्व अंगीकृत रुग्णालयात प्रत्येक पात्र रुग्णाला सेवा मिळत असल्याची खात्री करावी. याबाबत काही तक्रारी असतील तर त्याचा निपटारा तातडीने करावा. यासाठी जिल्हास्तरीय समितीने याबाबत पुढाकार घ्यावा, असे डॉ. शेटे म्हणाले.

मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या वैयक्तिक लाभाच्या योजना तात्काळ सुरू करा-माजी मंत्री आमदार संजय बनसोडे

उदगीर/पाटील मनेश

जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकरी बांधवांसाठी माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी पुढाकार घेतला असून

उदगीर विधानसभा मतदारसंघातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता शेतकरी आणि शेतमजुरांना शासकीय योजनांचा लाभ तातडीने मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे कृषी विभागासह संबंधित सर्व विभागांनी शेतकऱ्यांसाठी असलेल्या वैयक्तिक लाभाच्या योजना तात्काळ सुरू करून पात्र लाभार्थ्यांना त्याचा लाभ द्यावा, असे निर्देश माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

येथील मंगळवारी उदगीर येथील पंचायत समितीच्या सभागृहात विविध शासकीय विभागांच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते.

यावेळी उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, जिल्हा परिषदेचे बांधकाम सभापती ज्ञानेश्वर बिरादार, जिल्हा परिषद गटनेते दिलीप मटके, नगरसेवक सचिन हुडे, प्रा. शाम डावळे, तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, माजी उपसभापती बाळासाहेब मरलापल्ले, उपसभापती विकी भोसले, सर्जेराव भांगे, भुमी अभिलेख उपाधिक्षक रविंद्र कोरे, नगरपालीकेचे मुख्याधिकारी श्री. दिपक मोरे, उपअभियंता श्री जे.एल. उगीले, शाखा अभियंता अलका राठोड, धनराज नादरगे, प्रकाश बिरादार, कमलाकर फुले आदी यावेळी उपस्थित होते. मतदारसंघातील दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांच्या अडचणी, शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी तसेच प्रलंबित विकासकामांचा आढावा घेण्यात आला. यावेळी आमदार संजय बनसोडे यांनी, दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून शेती व्यवसाय अडचणीत आला आहे. अशा परिस्थितीत शासनाच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांचा फायदा शेतकऱ्यांना वेळेत मिळणे गरजेचे आहे. विविध योजनांसाठी पात्र असलेल्या शेतकऱ्यांचे अर्ज प्रलंबित न ठेवता आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून लाभार्थ्यांना अनुदान व योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे. विविध शासकीय योजनांची माहिती तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावी. केवळ कागदोपत्री कार्यवाही न करता प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचतो की नाही, याची अधिकाऱ्यांनी खात्री करावी. शेतकऱ्यांना शासकीय कार्यालयात वारंवार चकरा माराव्या लागू नयेत, यासाठी प्रशासनाने विशेष दक्षता घ्यावी, असे निर्देशही आमदार संजय बनसोडे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिले.

बैठकीत विविध विभागांच्या योजनांची सद्यस्थिती, प्रलंबित प्रस्ताव आणि लाभार्थ्यांना येणाऱ्या अडचणी याबाबत चर्चा करण्यात आली. शेतकरी हिताच्या योजनांच्या अंमलबजावणीत कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, अशी भूमिका आमदार संजय बनसोडे यांनी यावेळी मांडली.

बुद्ध लेणी खरोसा येथे बौद्ध धम्म परिषद उत्साहात संपन्न

खरोसा/संतोष सोनवणे

औसा तालुक्यातील प्राचीन व ऐतिहासिक बुद्ध लेणी खरोसा येथे आयोजित बौद्ध धम्म परिषद मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. यावेळी तथागत गौतम बुद्ध यांच्या दहा फूट उंच भव्य मूर्तीचे लोकार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या सोहळ्यास आदरणीय भीमराव यशवंतराव आंबेडकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात बुद्ध वंदना आणि त्रिशरण-पंचशील ग्रहणाने करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध यांच्या भव्य मूर्तीचे लोकार्पण करण्यात आले. या धम्म परिषदेला परिसरातील हजारो बौद्ध उपासक-उपासिकांनी उपस्थिती लावून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी प्रमुख मार्गदर्शन करताना भीमराव यशवंतराव आंबेडकर म्हणाले की,



तथागत गौतम बुद्ध यांच्या भव्य मूर्तीचे लोकार्पण; 'बुद्ध विचारच दु:खावर उपाय' आ.भीमराव आंबेडकर

आज समाजात वाढत चाललेली अशांतता, द्वेष, व्यसनाधीनता आणि मानसिक तणाव यावर बुद्ध विचार हाच प्रभावी उपाय आहे. तथागत गौतम बुद्धांनी जगाला समता, करुणा, मैत्री आणि प्रज्ञेचा संदेश दिला. दु:ख आहे, दु:खाचे कारण आहे आणि त्यावर उपायही आहे, हा मौलिक विचार बुद्धांनी जगाला दिला. मानवाला खऱ्या सुखाचा मार्ग दाखवणारा बुद्धांचा धम्म प्रत्येकाने आपल्या जीवनात आचरणात आणणे आवश्यक आहे, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमास औसा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार, ज्ञानराज चौगुले, धाराशिवचे युवा नेते मल्हार दादा यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची विशेष उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांनी खरोसा येथील बुद्ध लेणी हा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा असून या स्थळाचे संवर्धन, जतन व विकास करण्यासाठी सामूहिक प्रयत्न होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले.

बुद्ध विचारांचा प्रसार, धम्म संस्कृतीचे संवर्धन आणि सामाजिक समतेचा संदेश देणारी ही परिषद उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी धम्म परिषद आयोजन समिती, बौद्ध समाज बांधव, महिला मंडळ आणि युवकांनी विशेष परिश्रम घेतले.

पत्रकार बालासाहेब शिंदे यांचा कुलगुरू डॉ.इंद्र मणी यांच्या हस्ते विशेष सत्कार

उदगीर/पाटील मनेश

उदगीर गेल्या १५ वर्षांपासून सेंद्रिय शेती, गावरान बियाणे व आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार करणारे पत्रकार तथा कृणबी शेतकरी गटाचे अध्यक्ष बालासाहेब गोविंदराव शिंदे (अतनूरकर) यांचा कुलगुरू डॉ. इंद्र मणी यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ (परभणी), केव्हीके (लातूर) व आत्मा कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २२) रावणगाव (ता. उदगीर) येथील भीमराव डोनगापुरे यांच्या शेतावर 'दुष्काळी परिस्थितीत शाश्वत शेती' या विषयावर शेतकरी प्रशिक्षण पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. इंद्र मणी होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून आयसीएआर-अटारी पुणेचे संचालक डॉ. सुब्रोतो कुमार रॉय उपस्थित होते.

यावेळी विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश



अहिरे, संशोधन संचालक डॉ. भगवान असेवार, प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस सौ. आशाताई भिसे, विभागीय कृषी सहसंचालक महेश कुमार तीर्थकर, डॉ. पी. आर. देशमुख व प्रा. अरुण गुट्टे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डी. पी. जाधव, मनीषा बांगर, डॉ. वसंत सूर्यवंशी, प्रा. संदीप देशमुख व तालुका कृषी अधिकारी संदीप वळकुंडे यांनी परिश्रम घेतले. यावेळी परिसरातील शेतकरी व कृषी अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगभित्र

मकसूद पटेल (जिल्हा प्रतिनिधी) शेख मौला शेख उस्मान (उपसंपादक नांदेड जिल्हा आवृत्ती)

मो.9767785855, 9422797473 मो.9766664949 PRGI.No.- MHMAR/26/A0270

नांदेड जिल्हा आवृत्ती — गुरूवार दि.२६ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ५

आपले सरकार केंद्र गावातच सुरू करा; अन्यथा कारवाई करा

कळमनुरी/गंगासागर पंडित



कळमनुरी तालुक्यातील प्रत्येक गावात सुरू करण्याचे आदेश असलेले 'आपले सरकार सेवा केंद्र' काही ठिकाणी गावाबाहेर अन्य ठिकाणी चालविले जात असल्याचा आरोप करीत या प्रकाराची चौकशी करून नियमाप्रमाणे कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत वंचित बहुजन आघाडीचे तालुका सचिव मुंकिदा भाऊराव ढेपे यांनी कळमनुरी तहसीलदारांकडे २५ नोव्हेंबर रोजी निवेदन सादर केले. निवेदनात कळमनुरी तालुक्यातील आपले सरकार सेवा केंद्र व ग्रामपंचायत कार्यालयाची आयडी इतर ठिकाणी पैशांसाठी वापरली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या केंद्रामधून नागरिकांचे जात प्रमाणपत्र, विविध ऑनलाइन कामे, ७/१२, ८-अ, उत्पन्न दाखला तसेच इतर कागदपत्रे काढली जात असल्याचे निवेदनात नमूद आहे. गावातील नागरिक, महिला, विद्यार्थी व शेतकरी यांना संबंधित सेवा मिळविण्यासाठी केंद्र शोधावे लागत असल्याने गैरसोय होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. निवेदनात केंद्राची तात्काळ तपासणी करावी, आपले सरकार सेवा केंद्र ग्रामपंचायत कार्यालय किंवा गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी हलवावे, केंद्राची वेळ व दरफलक लावावा तसेच नियमाप्रमाणे कारवाई करावी, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी, हिंगोली आणि गटविकास अधिकारी, पंचायत समिती कळमनुरी यांनाही देण्यात आली आहे. त्यामुळे तालुका प्रशासन या आरोपांची चौकशी करून संबंधित केंद्रावर काय कारवाई करते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

प्रभाग १२ मध्ये बांधकामाचा मलबा रस्त्यावर; आठवडाभरापासून नागरिकांची गैरसोय!

नांदेड/प्रतिनिधी

नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्या झोन क्रमांक ५ अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्रमांक १२ मध्ये सार्वजनिक रस्त्यावर बांधकामाचा मोठ्या प्रमाणात मलबा टाकण्यात आल्याने परिसरातील नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. खान फंक्शन हॉलच्या शेजारील रस्त्यावर मागील आठवडाभरापासून बांधकामाचा मलबा पडून असल्याने रहदारीचा मार्ग अडथळ्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून मनपा प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

संबंधित घरमालकाने बांधकामातून निघालेला मलबा आणि बांधकामासाठी आणलेले वाळू मोठ्या प्रमाणातील थेट सार्वजनिक रस्त्यावर टाकल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. परिणामी या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या पादचाऱ्यांसह दुचाकीस्वार आणि वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्ता अडविला गेल्याने नागरिकांना पर्यायी मार्गाचा आधार घ्यावा लागत आहे.





बांधकाम अधिकृत की अनधिकृत? नागरिकांचा सवाल.संबंधित ठिकाणी सुरू असलेल्या बांधकामासाठी महानगरपालिकेची अधिकृत परवानगी घेण्यात आली आहे का? बांधकामाचे नियम पाळले जात आहेत का? सार्वजनिक रस्त्यावर बांधकामाचा मलबा टाकण्याची परवानगी कोणी दिली? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत. याची सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.रस्त्यावर पडून असलेल्या मलब्यामुळे लहान मुलांच्या सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.रात्रीच्या वेळी मलब्याचा अंदाज न आल्यास अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सार्वजनिक रस्ता हा नागरिकांच्या वापरासाठी असताना खासगी बांधकामासाठी त्याचा वापर कसा केला जात आहे,असा संतप्त सवालही परिसरातील रहिवाशांकडून उपस्थित केला जात आहे.मनपा अधिकाऱ्यांची पाहणी; मात्र कारवाई अद्याप गुलदस्त्यात!या प्रकरणाची माहिती मिळाल्यानंतर झोन क्रमांक ५ चे सहाय्यक आयुक्त,आणि स्वच्छता विभागाचे अधिकारी यांनी संबंधित ठिकाणी पाहणी केल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र पाहणी होऊनही रस्त्यावरील मलबा अद्याप हटविण्यात आलेला नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

प्रभाग क्रमांक १२ मधील आजी-माजी नगरसेवकांच्या दबावामुळे कारवाई रखडली आहे का?असा संशयही नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे. मात्र याबाबत अधिकृत स्पष्टीकरण अद्याप समोर आलेले नाही. प्रशासनाने पाहणी केल्यानंतरही प्रत्यक्ष कारवाई का होत नाही, हा प्रश्न अनुत्तरित आहे.

नियम सर्वसामान्यांसाठीच की बांधकामधारकांसाठीही?सार्वजनिक रस्त्यावर अतिक्रमण किंवा बांधकामाचा मलबा टाकल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्याची जबाबदारी महानगरपालिका प्रशासनाची आहे. मात्र,आठवडाभराप सून रस्ता अडविला जात असताना प्रशासनाकडून ठोस पाऊल उचलले जात नसल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.महानगरपालिका प्रशासनाने तातडीने या प्रकरणाची चौकशी करावी, संबंधित बांधकामाची परवानगी तपासावी, रस्त्यावरील संपूर्ण मलबा हटवून रहदारीचा मार्ग मोकळा करावा आणि नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

'आपले सरकार' सेवा केंद्र गावाऐवजी

बाळापूर शहरातच सुरू!

कोणाच्या आशीर्वादाने हा प्रकार सुरू

कळमनुरी/गंगासागर पंडित

ग्रामीण भागातील नागरिकांना विविध शासकीय सेवा, प्रमाणपत्रे तसेच शासनाच्या विविध योजनांसाठी लागणारी कागदपत्रे गावातच उपलब्ध व्हावीत, नागरिकांचा वेळ आणि पैसा वाचावा, या उद्देशाने शासनाच्या वतीने प्रत्येक गावात 'आपले सरकार सेवा केंद्र' सुरू करण्यात आले आहेत. मात्र, आखाडा बाळापूर परिसरात शासनाच्या या उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याचा प्रकार समोर आला आहे.

गावात आपले सरकार सेवा केंद्र देण्यात आले असताना संबंधित आपले सरकार सेवा केंद्र चालक गावात केंद्र न चालवता थेट आखाडा बाळापूर शहरातच आपले सरकार केंद्र चालवत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. त्यामुळे शासनाने ग्रामीण नागरिकांच्या सोयीसाठी घेतलेला निर्णय नेमका कोणाच्या आशीर्वादाने धाब्यावर बसविला जात आहे, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. शासनाच्या या योजनेमागे ग्रामीण भागातील नागरिकांना तालुक्याच्या किंवा शहराच्या ठिकाणी वारंवार हेलपाटे मारावे लागू नयेत, त्यांचा वेळ, पैसा आणि प्रवासाचा खर्च वाचावा, हा मुख्य उद्देश आहे. मात्र, संबंधित केंद्र गावात न चालविता आखाडा बाळापूर शहरातच चालविले जात असल्यास शासनाच्या उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

गावातील केंद्र शहरातच का?

गावातील नागरिकांसाठी मंजूर झालेले आपले सरकार सेवा केंद्र प्रत्यक्षात गावात उपलब्ध नसेल, तर शासनाने गावागावात ही सुविधा देण्याचा निर्णय कशासाठी घेतला? असा सवाल आता उपस्थित होत आहे. संबंधित केंद्र चालकाला गावाऐवजी शहरात सेवा देण्याची परवानगी नेमकी कोणी दिली? याबाबत प्रशासनाने स्पष्ट भूमिका मांडण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

'आपले सरकार' केंद्र गावात सुरू करण्याचा शासनाचा आदेश असताना त्याची अंमलबजावणी होत नसेल तर संबंधित अधिकाऱ्यांनी याची चौकशी करून तातडीने कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. गावातील नागरिकांच्या हक्काची सुविधा शहरात केंद्रित करण्यामागे नेमके कोणाचे पाठबळ आहे? संबंधित केंद्र चालकाला गावात केंद्र न चालवता आखाडा बाळापूर शहरात सेवा देण्याची मुभा कोणाच्या आदेशाने मिळाली? याची प्रशासनाने चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी जोर धरत आहे.

येल्लापूरचे ग्रामसेवक गादेवार यांची थेट ग्रामविकास मंत्र्याकडे तक्रार..

नांदेड/प्रतिनिधी

धर्माबाद तालुक्यातील यल्लापूर ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक) संदीप गादेवार यांच्याविरोधात थेट राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीच्या विकासासाठी मंजूर झालेल्या विद्युतीकरणाच्या कामासाठी आवश्यक असलेली डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट (DSC) जाणीवपूर्वक व आर्थिक अपेक्षा पोटी दिली जात नसल्याचा गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

निवेदनातील माहितीनुसार, यल्लापूर गावासाठी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करण्याच्या योजनेअंतर्गत विद्युतीकरणाच्या कामास ६ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या कामाची निविदा (टेंडर) प्रक्रिया राबवण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयाची आवश्यक असते. मात्र, गेल्या

भाजप अनुसूचित जमाती मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष मोहन आत्माराम तुरटवाड यांनी ग्रामविकास मंत्र्यांकडे सादर केली आहे.

सहा महिन्यांपासून वारंवार मागणी करूनही ग्रामसेवक संदीप गादेवार हे आर्थिक अपेक्षा ठेवून व जाणीवपूर्वक देण्यास टाळाटाळ करत असून, त्याबाबत विचारणा केल्यास उद्धट भाषेचा वापर करत असल्याचा आरोप निवेदनात नमूद आहे. या दिरंगाईमुळे मंजूर निधी व काम लॅप्स होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

ही तक्रार यल्लापूर ग्रामपंचायतीचे सदस्य सुनील गायकवाड आणि भाजप अनुसूचित जमाती मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष मोहन आत्माराम तुरटवाड यांनी ग्रामविकास मंत्र्यांकडे सादर केली आहे. निवेदनाची दखल घेत मंत्रालयातून ''सीईओ, नांदेड जि. प. तपासून उचित कार्यवाही करावी'' असा शेरा मारून पुढील चौकशी व कारवाईचे निर्देश देण्यात आल्याचे निवेदनावर दिसून येते.

टिपू सुलतानांचा इतिहास तरुणांसाठी प्रेरणादायी; व्यसनापासून दूर राहून वाचनाची कास धरा

कुंडलवाडी/मोहम्मद अफजल



शौर्य, पराक्रम आणि स्वातंत्र्यलढ्यातील अतुलनीय योगदानासाठी ओळखले जाणारे शहीद टिपू सुलतान यांचा इतिहास आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आहे. रॉकेट तंत्रज्ञानाच्या विकासात टिपू सुलतान यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. इंग्रजांशी दोन हात करणाऱ्या या पराक्रमी राजाचा इतिहास तरुणांनी जाणून घेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन बिलोलीचे उपनगराध्यक्ष अनुप अंकुशकर यांनी केले. शहीद टिपू सुलतान जयंतीनिमित्त आयोजित भव्य रक्तदान शिबिरात ते बोलत होते. यावेळी तरुणाईच्या बदलत्या जीवनशैलीवर भाष्य करताना ते म्हणाले की, आज अनेक तरुण व्यसनाच्या आहारी जाऊन स्वतःचे आयुष्य उद्ध्वस्त करीत आहेत. ही चिंतेची बाब असून तरुणांनी व्यसनापासून दूर राहून शिक्षण, वाचन आणि सामाजिक कार्याला प्राधान्य द्यावे. नगरपरिषदेच्या वतीने तरुणांसाठी भव्य वाचनालय उभारण्यात आले असून, तरुणांनी आपला अमूल्य वेळ वाचनालयात घालवून ज्ञानाची शिदोरी समृद्ध करावी, असे आवाहनही त्यांनी केले.या जयंती सोहळ्याचे औचित्य साधून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक बांधिलकी जपत रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यासोबतच चिमुकल्यांना बिस्किटे व खाऊचे वाटप करण्यात आले, तर रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करून माणुसकीचा संदेश देण्यात आला. यावेळी नगरसेवक शिवाजी गायकवाड, संदीप कटारे, वसीम बेग इनामदार, नगरसेविका प्र. गंगाधर मामा पुपलवार, डॉ. मनोज शंखपाळे, सामाजिक कार्यकर्ते मुकिंदर कुडके, गणेश मेडेकर यांच्यासह शहरातील अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

नगरसेवक मारोती कोटलावार यांच्या प्रयत्नांतून प्रभाग १० मधील खंडीत पाणीपुरवठा सुरळीत

कुंडलवाडी/प्रतिनिधी

शहरातील प्रभाग १० राम मंदिर परिसरातील विंधन विहीर तीन महिन्यांपूर्वी नादुरुस्त झाली होती. तीन वेळा दुरुस्त करूनही ती बंद पडल्याने या भागात पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता.

याबाबत या प्रभागातील नगरसेवक मारोती कोटलावार यांनी नगर परिषद कार्यालयात पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांतून त्या ठिकाणी नवीन विंधन विहीर बसविण्यात आली. त्यामुळे प्रभाग १० मधील खंडीत पाणीपुरवठा सुरळीत झाला असून प्रभागातील नागरिक नगर परिषद प्रशासन व नगरसेवक मारोती कोटलावार यांचे आभार व्यक्त करीत आहेत.

नगरीचा सेवक या नात्याने ज्या विश्वासाने नागरिकांनी नगर परिषद निवडणुकीत आपल्याला निवडून दिले, त्या विश्वासाला पात्र ठरावे, या अनुषंगाने प्रभाग क्रमांक १० मधील नगरसेवक नागरिकांच्या सेवेत तत्पर असल्याचे कोटलावार यांच्या आजपर्यंतच्या कार्यावरून दिसून येते.

नागरिकांच्या सुख-दुःखात सामील होणे, नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे, गल्लीतील स्वच्छतेकडे लक्ष देणे, दिवाबत्तीकडे लक्ष



देणे यासह गेल्या अनेक वर्षांपासून शहरातील नागरिकांची मागणी होती. शहरातील प्रवेशद्वार चुंगीनाका चौकातील अंधाराचे साम्राज्य मारोती कोटलावार यांच्या प्रयत्नांतून संपुष्टात आले.

यासह प्रभागातील राम मंदिर परिसरातील गेल्या तीन महिन्यांपासूनचा खंडीत पाणी प्रश्न नगरसेवक मारोती कोटलावार यांच्या प्रयत्नांतून संपुष्टात आला.याबद्दल प्रभागातील मतदार व शहरातील नागरिक त्यांच्या कार्याचे कौतुक करीत आहेत.

लोहयाच्या क्रीडा संकुलात साकारणार सांघिक खेळांचे दर्जेदार मैदान-आ.चिखलीकर

लोहा/अशोक सोनकांबळे

लोहा शहरातील क्रीडा संकुल हे तालुक्यातील अद्यावत क्रीडा संकुल म्हणून राज्यात ओळखले जावे, यासाठी येथे सुविधा उभारण्यासाठी आपला प्रयत्न असून पोलीस, सैन्य व अन्य भरतीची पूर्वतयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी २०० मीटरचा ट्रॅक, कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल या शालेय व महाविद्यालयीन स्तरावरील स्पर्धांसाठी हे क्रीडा संकुल तयार होणार आहे. जागा अपुरी आणि खाली-वर असल्याने अपेक्षित ट्रॅक तयार करण्यात अडचणी आल्या, पण येथे रस्ता, पाणी, वीज याची सोय करण्यात येईल. ही वास्तू आपली आहे त्यांची जपणूक सर्वांनी करावी, असे प्रतिपादन आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले आहे.

लोहा शहरातील बेरळी रोडवर दूध डेअरी केंद्रालगत सांघिक खेळ व सैन्य, पोलीस भरतीची पूर्वतयारी करणाऱ्या युवक-युवतींसाठी भव्य मैदान तयार करण्यात येत आहे. तीन कोटी रुपयांच्या कामाचा शुभारंभ आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी तहसीलदार विठ्ठल परळीकर, नगराध्यक्ष शरद पाटील, युवा नेते सचिन पाटील चिखलीकर, माजी सभापती आनंदराव पाटील , उपनगराध्यक्ष करीम शेख, जिल्हा क्रीडा अधिकारी भैरवनाथ नाईकवडी, सा. बां. विभागाचे अभियंता सुमित पाटील, तालुका क्रीडा अधिकारी जयप्रकाश तबघाले, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, गटनेते भास्कर पवार, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, बालाजी खिल्लारे ,रमेश माळी, रा कॉ तालुकाध्यक्ष मनोहर पाटील भोसीकर नगरसेवक गणेश बगाडे, श्याम पाटील, शिवा पवार, दत्ता शेटे, शंकर वट्टमवार, अविनाश पवार, तुकाराम दाढेल, राजेश बोडके, माजी सरपंच प्रल्हाद वडजे, बंडू पाटील वडजे, अनिल धुतमल, गुत्तेदार अविनाश सूर्यवंशी, मंडळ अधिकारी ठाकूर, तलाठी गाढे यासह पदाधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दीड महिन्यांपूर्वी क्रीडा संकुलासाठी तीन कोटी रुपयांचा निधी जाहीर केला होता. त्या कामाचा



शुभारंभ रविवारी (ता. २३) करण्यात आला. सैन्य भरती, पोलीस भरतीसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना धावण्याचा ट्रॅक, तसेच सांघिक खेळाचे मैदान, टेनिस खेळाचा अद्यावत हॉल या सुविधा, सोबतच बेरळी फाटा ते क्रीडा संकुल रोड व सौर दिवे याची व्यवस्था येथे होणार आहे. या वास्तू जतन करणे आवश्यक आहे, त्यासाठी शहरवासीय नागरिकांना आपले क्रीडा संकुल ही भावना ठेवायला पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. राज्यस्तरीय खुल्या कबड्डी स्पर्धा घेण्याचा मनोदय आ. चिखलीकर यांनी व्यक्त केला आहे. दीड महिन्यांपूर्वी त्यांनी ही घोषणा केली होती. पोलीस, सैन्य भरतीची पूर्वतयारी करणाऱ्यांना याचा फायदा होणार असून, आता प्रत्यक्षात कामाला सुरुवात झाली आहे.

क्रीडा संकुलात सांघिक खेळाचे मैदान

लोहा येथील क्रीडा संकुलात तब्बल तीन कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचा शुभारंभ माजी खासदार, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते पार पडला. यात मैदानावर २०० मी ची धावपट्टी तयार करणे - (१०० ५५), कबड्डीचे २ मैदाने - (१० १३), खो-खो मैदान - (२७ १६), व्हॉलीबॉल ची २ मैदाने तयार करणे - (१६ ९), बास्केटबॉल कोर्ट - (२८ १५), अस्तित्वातील क्रीडासंकुल इमारतीची दुरुस्ती करणे, रंगरंगोटी व इतर कामे करणे, अंतर्गत सीसी रस्ता व नाली बांधकाम पार्किंग शेड , पेव्हर ब्लॉक बसविणे या कामांचा समावेश आहे.

इंजि.सुमित पाटील अन् दर्जेदार काम

कंधार येथील उपजिल्हा रुग्णालय इमारत पाहून खुद्द राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, आरोग्यमंत्री आंबिटकर यांनी उपविभागीय अभियंता सुमित पाटील यांच्या कामाचा गौरव केला. आ. चिखलीकर यांनी रुग्णालयात एसडीएम ऑफिस व उद्यान ही कामे कंधारच्या वैभवात भर टाकणारी आहेत, असे अभिमानाने सांगितले. तरुण आणि दर्जेदार, आकर्षक कामाची ओळख देणारे उपअभियंता सुमित पाटील यांच्या अधिपत्याखाली हे क्रीडा संकुल उभारले जाणार आहे. त्यामुळे कामाचा दर्जा उच्च राहणार आहे, अशी चर्चा तालुक्यात सुरू आहे.

होमगार्ड जवानांनी कर्तव्य निष्ठेने व प्रामाणिकपणे पार पाडावे जिल्हा समादेशक तथा अपर पोलीस अधीक्षक संदीप जाधव यांचे आवाहन

नांदेड/शेख मकसूद लोहगावकर

होमगार्ड जवानांनी आपले कर्तव्य निष्ठेने आणि प्रामाणिकपणे पार पाडावे, असे आवाहन होमगार्डचे जिल्हा समादेशक तथा अपर पोलीस अधीक्षक संदीप जाधव यांनी केले.जिल्ह्यातील पुरुष होमगार्ड जवानांसाठी दि. १९ नोव्हेंबरपासून सुरू असलेल्या उजळणी प्रशिक्षण शिबिराला बुधवारी त्यांनी भेट दिली. यावेळी जवानांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. केंद्र नायक संतोष जैस्वाल, समादेशक अधिकारी प्रकाश कांबळे आणि प्रमुख लिपिक अभिषेक देशमुख यांची यावेळी उपस्थिती होती.संदीप जाधव म्हणाले की, पोलीस दलाला होमगार्ड जवानांचे नेहमीच सहकार्य लाभते. 'निष्काम सेवा' हे ब्रीदवाक्य असलेल्या होमगार्ड जवानांनी सेवाभाव आणि शिस्त कायम राखत आपली जबाबदारी पार पाडावी. आगामी काळातही सर्व जवानांनी कर्तव्याप्रती निष्ठा आणि प्रामाणिकपणा जपावा.जवानांना सशस्त्र मानवंदनाशिबिरातील होमगार्ड जवानांनी परेड कमांडर तथा वरिष्ठ पलटन नायक बळवंत अटकोरे यांच्या नेतृत्वाखाली अपर पोलीस अधीक्षक संदीप जाधव यांना सशस्त्र मानवंदना दिली. यावेळी त्यांनी जवानांच्या संचलनाचे कौतुक केले. तसेच जवानांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही दिली.विविध विषयांचे प्रशिक्षणउजळणी प्रशिक्षण शिबिरात सहभागी जवानांना पदकवायत, लाठी कवायत, रायफल कवायत, प्रथमोपचार, अग्निशमन, पूर विमोचन आणि आपत्ती व्यवस्थापन आदी विषयांचे प्रशिक्षण दिले जात आहे. आपत्कालीन परिस्थितीत प्रभावीपणे काम करण्यासाठी जवानांना आवश्यक कौशल्ये शिकविण्यावर या प्रशिक्षणात भर देण्यात येत आहे. शिबिराच्या कालावधीत उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षक नेहा शिंदे यांनी जवानांना वाहतुकीचे नियम आणि वाहतूक सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले.



शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी केंद्र नायक संतोष जैस्वाल, प्रशासकीय अधिकारी वैशाली डावरे, समादेशक अधिकारी प्रकाश कांबळे, प्रमुख लिपिक अभिषेक देशमुख, कनिष्ठ लिपिक पूजा शिंदे, वरिष्ठ पलटन नायक बशिरोद्दीन शेख, वरिष्ठ पलटन नायक बळवंत अटकोरे, हनुमंत देवकते, भारत कंधारे, प्रकाश कांबळे, संतोष चव्हाण, गोविंद चिखलवाड, अतुल इंगोले आदींनी परिश्रम घेतले.

मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी शेवटची संधी-उपविभागीय अधिकारी शिंदे

कुंडलवाडी/प्रतिनिधी

बिलोली तालुक्यातील मतदार आद्याप काही कारणास्तव मतदार यादित आपले नाव समाविष्ट करू शकले नाही.अशा मतदारांनी दि.३० नोव्हेंबर पर्यंत मतदार यादीत नाव समाविष्ट करून घ्यावे. असे आवहान अजय शिंदे, उपविभागीय अधिकारी बिलोली तथा मतदान नोदनी अधिकारी ९० देगलूर विधानसभा मतदार संघ व गजानन शिंदे, साहायक मतदान नोदनी अधिकारी तहसीलदार बिलोली तसेच दिपक मरळे, नायब तहसीलदार निवडणूक विभाग बिलोली, यांच्यावतीने करण्यात आले.

आद्या मतदान यादीत काही कारणास्तव जसे मतदार पत्यावर राहात नाही, किंवा गणना प्रपत्र मतदार यादीत समाविष्ट न झाल्यामुळे मतदारांच्या अनुपस्थित, स्थलांतरित, मृत, दुबार, ईतर अशा मतदारांनी दि.३० नोव्हेंबर पर्यंत पुनर गणना प्रपत्र भरण्यासाठी केंद्रस्तरीय अधिकारी यांच्या मार्फत गणना प्रपत्र भरून घेण्याच कार्यक्रम निश्चित करण्यात आले.तरी मतदारांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी ही शेवटची संधी आहे.

याकामी ईसीआयनेट वर ईसीआयनेट,- सह मतदारांना गणनाप्रपत्र ऑनलाईन भरण्याची सुविधा ऊपलब्ध करून देण्यात आली आहे.

तरी केंद्रस्तरीय मतदार अधिकारी यांच्याशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्र देवून गणना प्रपत्र भरून घ्यावे.मतदान यादीत आपल नाव समाविष्ट करून घ्यावे.असे आवहान अजय शिंदे, उपविभागीय अधिकारी तथा मतदान नोदनी अधिकारी ९० देगलूर विधानसभा मतदार संघ व गजानन शिंदे, साहायक मतदान नोदनी अधिकारी तहसीलदार बिलोली, तसेच दिपक मरळे, नायब तहसीलदार निवडणूक विभाग बिलोली, यांच्यावतीने करण्यात आले.

26 Nov 2026_Layout 1 11/25/2026 11:40 PM Page 2

४ लाखांच्या घनवनाची राख; ४५० झाडे आगीत खाक!

९ हजार वृक्षलागवडीला आगीचा फटका; सीसीटीव्ही असूनही दोषींचा शोध लागेना, सामाजिक वनीकरण विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

धारूर/अतुल शिनगारे

शहरातील विश्रामगृह परिसरात सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने चार लाख रुपये खर्चून ३० गुंठे क्षेत्रावर करण्यात आलेल्या नऊ हजार झाडांच्या घनवन लागवडीला आगीचा मोठा फटका बसला आहे. पंधरा दिवसांपूर्वी लागलेल्या आगीत सुमारे ४०० ते ४५० झाडे जळून खाक झाली. विशेष म्हणजे, परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे असतानाही आग लावणाऱ्या व्यक्तीचा शोध लागलेला नाही. घटनेला पंधरा दिवस उलटूनही ठोस कारवाई न झाल्याने सामाजिक वनीकरण विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

विश्रामगृह परिसरात जून महिन्यात घनवन निर्मितीचा उपक्रम राबविण्यात आला होता. यामध्ये कडुनिंब, बाभूळ, चिंच, साग, सीताफळ यांसह विविध फळझाडे व औषधी वनस्पतींची



लागवड करण्यात आली होती. झाडांच्या संरक्षणासाठी कुंपण आणि नियमित पाणीपुरवठ्यासाठी ठिबक सिंचनाची व्यवस्थाही करण्यात आली होती. मात्र, आगीमुळे शेकडो झाडांचे नुकसान झाले. परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे

एकीकडे शासन वृक्षलागवडीवर लाखो रुपये खर्च करीत असताना दुसरीकडे लागवड केलेली झाडे आगीत नष्ट होत आहेत. सीसीटीव्ही असूनही दोषींचा शोध लागत नसल्याने चार लाखांच्या घनवनाची राख झाल्यानंतरही विभागाकडून ठोस कारवाई कधी होणार, असा सवाल नागरिकांतून उपस्थित होत आहे.

कर्मचारी वास्तव्यास असतानाही आग नेमकी कोणी लावली, याचा उलगडा झालेला नाही.याबाबत वनरक्षक कृष्णा जगताप यांनी अज्ञात व्यक्तीचा शोध सुरू असल्याचे सांगितले. तर वनक्षेत्राधिकारी महेश पवळ यांनी घटनेचा पंचनामा करून कारवाईचा प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठविल्याचे स्पष्ट केले.

हिंगोली उत्पादन शुल्क विभागाचा कारभार वाऱ्यावर: ६ महिन्यांपासून अधीक्षक नाही

अवैध दारू विक्रीकडे दुर्लक्ष; महसूल वसुलीही पिछाडीवर

परभणी/प्रतिनिधी

शासनाच्या तिजोरीत कोट्यवधी रुपयांचा महसूल जमा करणाऱ्या राज्य उत्पादन शुल्क विभागाचा हिंगोली जिल्ह्यातील कारभार सध्या वाऱ्यावर असल्याचे चित्र आहे. गेल्या सहा महिन्यांपासून विभागाला कायमस्वरूपी अधीक्षक नसल्याने जिल्ह्याचा कारभार प्रभारी अधिकाऱ्यांच्या भरवशावर सुरू आहे

लातूर येथील अधिकाऱ्यांकडे हिंगोलीचा अतिरिक्त पदभार सोपविण्यात आला असून, संबंधित अधिकारी आठवड्यातून केवळ दोन दिवस कार्यालयात येत असल्याची माहिती आहे. परिणामी, कार्यालयीन कामकाजासह



क्षेत्रीय स्तरावरील नियंत्रणही ढिले पडल्याचे दिसत आहे. ग्रामीण भागात अवैध दारू विक्रीच्या तक्रारी वाढत असताना उत्पादन शुल्क विभागाकडून अपेक्षित कारवाई होत नसल्याने या विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

हिंगोली जिल्ह्यात देशी दारूची ४९, तर बिअरबारची २०९ दुकाने असून, याशिवाय परमिट रूमही आहेत. या दुकानांच्या परवाना नूतनीकरणातून, नवीन परवाने देण्यातून तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करून शासनाला मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो. चालू आर्थिक वर्षासाठी जिल्ह्याला मार्च अखेरपर्यंत ७.२७ कोटी रुपयांच्या महसूल वसुलीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. मात्र, आठ महिने उलटूनही विभागाला केवळ ८८ लाख रुपयांचाच (पान २ वर)



आसूबाई देवी यात्रेनिमित्ताने कैलासवाशी पाटलोबा मानाजी मुंडे यांच्या स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र तथा शिवसेना नेते प्रा.टी.पी.मुंडे सरांनी शेवटची कुस्ती रोख रक्कम दहा हजार रुपयांची दीपक कराड विरुद्ध बाळू भैरवाल यांची कुस्ती लावली. कुस्ती लावताना त्यांच्यासह नागपूर जिल्हा परिषदेचे सदस्य प्रदीप भैय्या (बबलू शेठ) मुंडे , सूर्यकांतजी मुंडे, विनायकराव गडदे, भोपल्याचे सरपंच बाळासाहेब मुंडे आदी उपस्थित होते.

७ गावांत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर तहसीलदारांसह अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष पाहणी

धारूर/अतूल शिनगारे

धारूर तालुक्यात दिवसेंदिवस पाणीटंचाईची तीव्रता वाढत असून ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. पाण्याचे नैसर्गिक स्रोत आटू लागल्याने निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून तालुक्यातील सात गावांत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. दरम्यान, बुधवार, ता. २५ रोजी तहसीलदार श्रीकांत निळे, गटविकास अधिकारी शेषेराव कांदे यांच्यासह संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी टँकर सुरू असलेल्या गावांना भेटी देऊन पाणीपुरवठ्याची प्रत्यक्ष पाहणी केली.

यंदा पावसाने ओढ दिल्याने तालुक्यातील छोटे-मोठे तलाव आणि साठवण तलाव कोरडे पडले आहेत.



अनेक गावांतील विहिरी व बोअरवेलची पाणीपातळी मोठ्या प्रमाणात खालावली असून काही ठिकाणचे जलस्रोत पूर्णपणे आटले आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. नागरिकांसह पशुधनाच्या पाण्याची गरज भागविणेही कठीण होत आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांकडून टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी केली जात होती.प्रशासनाने सात गावांत टँकर सुरू करून नागरिकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला (पान २ वर)

न.प.त विरोधात काम करणाऱ्यांनाच बक्षीस!

माजलगाव भाजपमध्ये विश्वासघाताचा जाहीर सत्कार

माजलगाव/प्रतिनिधी

भाजप बीड महिला मोर्चा जिल्हा कार्यकारिणी जाहीर होताच माजलगाव भाजपमध्ये जणू भूकंप झाला आहे. जिल्हाध्यक्ष सौ. सुवर्णा काकासाहेब लांबरूड यांनी जाहीर केलेल्या कार्यकारिणीत माजलगावातून जिल्हा उपाध्यक्षपदाची माळ घालण्यात आली. मात्र ही माळ निष्ठेची नाही, तर वशिल्याची आहे, असा घणाघाती आरोप करत भाजपच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी बंडाचे निशाण फडकवले आहे. नगर परिषद निवडणुकीत पक्षाच्या विरोधात उघडपणे काम केलेल्यांना पक्षाने सन्मानाने पदे बहाल केली, तर रात्रंदिवस पक्षाचा झेंडा खांद्यावर घेऊन फिरणाऱ्या एकनिष्ठ महिलांना मात्र हद्दपार केले, अशी संतप्त भावना आज गल्लीबोळात घुमत आहे.

एकनिष्ठांना वनवास, वशिलेबाजांना सिंहासन!

पक्षासाठी घरदार विसरून, ऊन-पाऊस न पाहता राबणाऱ्या महिलांना भाजपमध्ये स्थानच उरले नाही का? हा जळजळीत सवाल आता प्रत्येक कार्यकर्त्याच्या ओठावर आहे. वशिल्याच्या कुबड्यावर पदे मिळविणाऱ्यांमुळे पक्षाची मुळेच पोखरली जात आहेत, असा आरोप कार्यकर्ते करत आहेत.

वशिल्याने मिळविलेली पदे पक्षासाठी ठरताहेत धोका : नाराज कार्यकर्त्यांचा उद्रेक

भाजपला आता शिरोमणी उरला नाही, त्यामुळेच गल्लीतील कार्यकर्त्यांना महत्त्व आले आहे. पण हेच कार्यकर्ते जर दुखावले गेले, तर पक्षाला तारणारा तरी कोण उरणार? अशी खंतही व्यक्त होत आहे.

पुनर्विचार नाही तर उद्रेक अटळ!

या नियुक्तीचा तातडीने पुनर्विचार करावा, अशी आग्रही मागणी भाजप कार्यकर्त्यांनी केली आहे. निष्ठावंत, प्रामाणिक आणि निवडणुकीत पक्षासाठी खऱ्या अर्थाने घाम गाळणाऱ्या महिलांना न्याय मिळालाच पाहिजे. वशिल्याने मिळविलेली पदे ही पक्षासाठी शोभा नाही, तर धोका आहे, हे वरिष्ठ नेतृत्वाने वेळीच ओळखावे. अन्यथा माजलगावातील हा असंतोषाचा भडका पूर्ण जिल्हाभर पसरण्यास वेळ लागणार नाही, असा थेट इशारा नाराज कार्यकर्त्यांनी दिला आहे.

तरुणांच्या हातात संविधानाच्या विचारांची मशाल देण्याचा ॲड.राहुल अर्जुन पायके यांचा प्रयत्न!

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी



आजच्या आधुनिक आणि डिजिटल युगात तरुणाईने भारतीय संविधानाचा अभ्यास करून आपल्या हक्कांची, अधिकारांची आणि कर्तव्यांची जाणीव करून घ्यावी, असे आवाहन पीपल्स थॉटस इन इंडिया युथ क्लबचे संस्थापक अध्यक्ष ॲड. राहुल अर्जुन पायके यांनी तरुण मित्रांसाठी लिहिलेल्या खुल्या पत्रातून केले आहे.

भारतीय संविधान हे केवळ कायद्यांचे पुस्तक नसून प्रत्येक भारतीय नागरिकाच्या स्वातंत्र्याचा, सन्मानाचा, समानतेचा आणि न्यायाचा भक्कम आधार आहे. संविधानामुळे प्रत्येक नागरिकाला आपले विचार मांडण्याचे स्वातंत्र्य, शिक्षणाचा अधिकार, व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि समानतेची संधी प्राप्त झाली आहे. त्यामुळे संविधानाचा अभ्यास केवळ वकील, न्यायाधीश किंवा स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांपुरता मर्यादित नसून प्रत्येक नागरिकासाठी आवश्यक आहे, असे ॲड. राहुल अर्जुन पायके यांनी नमूद केले.

आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया आणि इंटरनेटच्या माध्यमातून व्यक्त होताना तरुणांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्यासोबत सामाजिक जबाबदारीही जपली पाहिजे. अफवांपासून दूर राहणे, माहितीची सत्यता पडताळणे, द्वेषपूर्ण विचारांना बळी न पडणे आणि इतरांच्या मतांचा आदर करणे ही सुजाण नागरिकांची ओळख आहे.

संविधानाने नागरिकांना अधिकारांसोबत मूलभूत कर्तव्यांचीही जाणीव करून दिली आहे. पर्यावरणाचे संरक्षण, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण, (पान २ वर)

१,२ व ३ डिसेंबर रोजी कामगारांचा संसदेवर विराट मोर्चा

मोठ्या संख्येने सहभागी व्हा-प्रा.बी.जी.खाडे

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

सीटू कामगार संघटनेच्या वतीने १,२ व ३डिसेंबर रोजी संसदेवर विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.या मोर्चाला देशभरातून एक लाखापेक्षा जास्त कामगार सहभागी होणार आहेत. देशातील प्रचंड बेरोजगारी, कामगारांच्या नोकरीची सुरक्षितता, अंगणवाडी, आशा, शालेय पोषण आहार, गटप्रवर्तक यांना अनेक वर्षांपासून कायम करण्याची मागणी यासाठी या मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन सीटू चे नेते प्रा.बी.जी. खाडे यांनी केले आहे.

केंद्र सरकारने उद्योगपतींच्या हितासाठी कामगारांनी लढून मिळवलेले कामगार कायदे रद्द केले आहेत व उद्योगपतीच्या हितासाठी चार श्रमसंहिता तयार केलेल्या आहेत. या चार श्रमसंहितेमुळे कामगारांच्या जीवनातील सुरक्षितता संपली आहे. सिटू कामगार संघटनेचा चार श्रमसंहितेला विरोध आहे. सरकारने किमान वेतन ४२ हजार रुपये द्यावे व किमान पेन्शन २१००० रुपये मिळाली पाहिजे अशी मागणी करण्यात आली आहे. चार श्रमसंहिता रद्द करा, अशा, गटप्रवर्तक, अंगणवाडी, शालेय पोषण आहार, स्त्रीपरिचर, ग्रामरोजगार सेवक इत्यादी योजना मध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायम करा, सार्वजनिक उद्योगातील कंत्राटीकरण बंद करा, समान कामासाठी समान वेतन द्या, बांधकाम कामगारांना मासिक दहा हजार रुपये अनुदान द्या आदी प्रमुख मागण्या या मोर्चात करण्यात आलेल्या आहेत. या मोर्चात बीड जिल्ह्यातील कामगारांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन बीड जिल्हाध्यक्ष डॉ. अशोक थोरात, कॉ. किरण सावजी, सुवर्णा रेवले, कॉ. प्रकाश वाघमारे आदींनी केले आहे.

धाराशिवच्या शेतकऱ्यांना पीक विमा देण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी संपूर्ण महाराष्ट्रात करा-वसंत मुंडे

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

अतिवृष्टी, गारपीट, दुष्काळजन्य परिस्थिती तसेच अन्य नैसर्गिक आपत्तींमुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचे वारंवार मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. शेतकऱ्यांनी खरीप २०२० पासून आजपर्यंत पीक विमा योजनेतील नियमांचे पालन करून विमा हप्ते भरले आहेत. मात्र, विमा कंपन्या आणि शासनाकडून लादण्यात येणाऱ्या विविध तांत्रिक अटींमुळे अनेक शेतकरी पीक विम्याच्या लाभापासून वंचित राहत असल्याचा आरोप किसान काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला आहे.

पीक नुकसान झाल्यानंतर ७२ तासांच्या आत माहिती देण्याची अट अनेक शेतकऱ्यांना माहीत नसते. तांत्रिक माहितीचा अभाव आणि योग्य मार्गदर्शन न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांकडून वेळेत तक्रार नोंदवली जात नाही. याचाच आधार घेत विमा कंपन्या तांत्रिक कारणे पुढे करून नुकसानभरपाई नाकारत असल्याचे मुंडे यांनी सांगितले.

धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी व लोकप्रतिनिधींनी पीक विम्याच्या प्रश्नावर मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल केली होती. न्यायालयाने शेतकऱ्यांच्या बाजूने निर्णय दिल्यानंतर संबंधित विमा कंपनीने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने शेतकऱ्यांना पीक विमा देण्यासंदर्भात आदेश पारित केले आहेत. या न्यायालयीन निर्णयाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व जिल्ह्यांतील पात्र शेतकऱ्यांनाही न्याय मिळावा, अशी मागणी वसंत मुंडे यांनी केली आहे.

अनेक वेळा शेतकरी पीक काढल्यानंतर शेतात गोळा करून ठेवतात. मात्र, त्यानंतर अतिवृष्टीमुळे काढलेले पीक वाहून जाते किंवा भिजून खराब होते. अशा परिस्थितीत



शेतकऱ्यांनी शासनाकडे वारंवार पत्रव्यवहार करूनही विमा कंपन्या नियम आणि तांत्रिक अटींचा आधार घेत नुकसानभरपाई देण्यास टाळाटाळ करतात. या समस्येची दखल घेत न्यायालयांनी शेतकऱ्यांच्या हिताचे आदेश दिल्याचे मुंडे यांनी नमूद केले.

पीक विमा योजनेतील पेरणीपूर्व नुकसान, स्थानिक नैसर्गिक आपत्ती, हंगामातील प्रतिकूल परिस्थिती आणि पीक काढणीनंतरचे नुकसान या महत्त्वाच्या चार संरक्षणात्मक बाबींच्या अंमलबजावणीचा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. सुधारित पीक विमा योजनेतील बदलांमुळे शेतकऱ्यांना पेरणीपासून काढणीपर्यंत झालेल्या नुकसानीची वेळेत भरपाई मिळण्यात अडचणी निर्माण होत असल्याचा दावा त्यांनी केला. सन २०१६ पासून पीक विमा योजनेचे काम मोठ्या प्रमाणावर खासगी विमा कंपन्यांकडे सोपवण्यात आले आहे. (पान २ वर)

मा.मंत्री दिलीपराव देशमुख यांनी देशमुख परिवाराची सांत्वन भेट



परळी वैजनाथ/प्रतिनिधी

आदरणीय भाऊसाहेब उर्फ विठ्ठलराव नरहरराव देशमुख यांच्या दुःखद निधनामुळे देशमुख परिवारावर कोसळलेल्या दुःखात सहभागी होत माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांनी आज देशमुख परिवाराची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी त्यांनी दिवंगत भाऊसाहेब यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त करून कुटुंबीयांचे सांत्वन केले.या भेटीदरम्यान माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी श्री वैजनाथ ज्योतिर्लिंग देवस्थानचे सचिव श्री. राजेश देशमुख व डॉ. दुष्यंत देशमुख यांची भेट घेतली.

कपिलधारहून परतणाऱ्या मन्मथस्वामी भक्तांसाठी परळीत महाप्रसादाची व्यवस्था!

श्री मन्मथस्वामी सेवा संघाचा स्तुत्य उपक्रम; ११ हजार भाविकांनी घेतला लाभ

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

श्री क्षेत्र कपिलधार येथील संत शिरोमणी श्री मन्मथस्वामी यांच्या पवित्र समाधीचे दर्शन घेऊन आपल्या गावी परतणाऱ्या हजारो भाविकांची पावले आता बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र वैद्यनाथ प्रभूंच्या दर्शनासाठी परळीकडे वळत आहेत. कपिलधारची यात्रा आणि परळीतील प्रभू वैद्यनाथाचे दर्शन हे जणू भाविकांसाठी श्रद्धेचे समीकरणच बनले आहे. या भाविकांच्या सेवेसाठी परळीतील वीरशैव लिंगायत समाज व श्री मन्मथस्वामी सेवा संघाच्या वतीने दरवर्षी महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते.

बुधवार, दि. २५ नोव्हेंबर रोजी सकाळी ५



वाजल्यापासून येथील श्री संत गुरुलिंग स्वामी मठ संस्थान, बेलवाडी येथे खिचडी व आमटी महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. यंदा तब्बल सात क्विंटल तांदळाची खिचडी व आमटी तयार करण्यात आली होती. दिवसभरात सुमारे ११ हजार भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री व सौ. शिवाप्पा चौंडे यांच्या हस्ते संत शिरोमणी श्री मन्मथस्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महाप्रसादासाठी लागणारी खिचडी व आमटी राजाभाऊ खोत यांनी तयार केली होती. कपिलधार येथील यात्रा संपवून परतणाऱ्या भाविकांसाठी चहा, पाणी व महाप्रसादाची उत्तम व्यवस्था (पान २ वर)



जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशन, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, 'जगमित्र' बाजीप्रभू नगर नेहरू चौक (तळ) परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड तर दैनिक जगमित्र कार्यालय घर क्र.२०, खडगाव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बौध्द विहार जवळ लातूर घर क्र.२२/२० एसटी कॉलनी, बाशी नाका, धाराशिव तनिश ऑर्किड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी आरडी., चारोली फाटा, ता. हवेली, पुणे ९-२-३४६, बिलाल नगर, देलगूर नाका, इतवारा नांदेड प्लॉट क्र.६६/२ सीटीएस क्र.९०, मयुरी रेसी, महिंद्रा शोरूमच्या मागे, छ.संभाजीनगर रोड, जालना येथे प्रकाशित केले आहे. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) कार्यकारी संपादक : बिलाल शेख मो.नं.९४२२४०४७४० निवासी संपादक : मकरंद जहागीरदार ९४२२२१६०६१

'Jagamitra' is printed by Balasaheb Jijaram Kadbane (Printer, Publisher, Owner, and Editor) at Jagamitra Offset, near Nehru Chowk, Bajiprabhu Nagar, Parli Vaijnath (Dist. Beed, Maharashtra). It is published from the following locations: 'Jagamitra' Office, Bajiprabhu Nagar, Nehru Chowk (Ground Floor), Parli Vaijnath 431515, Dist. Beed; House No. 20, Khadgaon Road, Krantinagar, near Vishwashanti Buddha Vihar, Latur; House No. 22/20, ST Colony, Bashi Naka, Dharashiv; Tanish Orchid, Phase-2, R-Wing, 1105, Alandi Road, Charoli Phata, Tal. Haveli, Pune; 9-2-346, Bilal Nagar, Delgur Naka, Itwara, Nanded; and Plot No. 66/2, CTS No. 90, Mayuri Residency, behind Mahindra Showroom, Chh. Sambhajinagar Road, Jalna. (The Editor does not necessarily agree with the content or news published in the daily; the responsibility for content selection rests with the designated person as per the PRB Act.) Executive Editor: Bilal Shaikh (Mobile No. 9422404740) Resident Editor: Makarand Jahagirdar (Mobile No. 9422216061)